


# यशस्विनी अभियान

**- विश्वास जयदेव ठाकूर**

> प्रशिक्षणाशिवाय केलेले कोणतेही कार्य त्याच्या अपेक्षित उद्दिष्टांपर्यंत पोहोचू शकत नाही हे यापूर्वी वारंवार सिद्ध झालंय. सामाजिक किंवा राजकीय कामही याला अपवाद नाही. आमच्या यशस्विनी अभियानाच्या कामाचा 'प्रशिक्षण' हा केंद्रबिंदू आहे. भविष्यातील सामाजिक कार्यकर्ते हे फक्त प्रेरणेने बनलेले कार्यकर्ते नसतील तर सामाजिक प्रेरणांनी प्ररित प्रशिक्षित कार्यकर्तेअसतील, हा आमचा दृढ निश्चय आहे
>
> – सुप्रिया सुळे

# बचत गटांसाठी माहिती-तंत्रज्ञान, व्यवस्थापनाचे आधुनिक स्कूल



*यशदा, पुणे येथील व्हर्च्युल सेंटरमध्ये सहभागी झालेल्या बचत गटातील महिला.*

बांगला देशाने महिलांच्या सबलीकरणासाठी अभिनव क्रांती करून तिला आत्मनिर्भरतेचा नवा आयाम दिला आहे. बचत गट चळवळीला आधुनिक व प्रयोगशील रूप देण्याचा प्रयत्न आज बांगला देशाबरोबरच भारतात, महाराष्ट्रातही सुरू आहे. सामाजिक क्रांतीबरोबरच आर्थिक क्रांतीचा हा समर्थ पर्याय तिच्या जगण्याला अर्थ देणाराच आहे. आधुनिक बाजारपेठांमध्ये बचत गटांच्या वस्तूंना मिळणारा प्रतिसाद बघता ही चळवळ एका निश्चित वळणावर आली आहे. या चळवळीला योग्य व्यावसायिक दिशा देण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईतर्फे सुप्रिया सुळे यांच्या संयोजनाखाली यशस्विनी अभियानाचे व्यापक अभियान सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून सिम्बॉयासिस इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, पुणे बरोबर सामंजस्य करार झाला आहे. त्यामार्फत बचत गटांना बाजाराभिमुख बनविण्यासाठी २०२० मोहीम हाती घेण्यात आली आहे. यात महिलांना व्यवस्थापनाचे धडे देण्याबरोबरच एकूणच व्यक्तिमत्त्व विकास आदींचे शास्त्रीय धडे या माध्यमातून देण्याचे महत्त्वाकांक्षी प्रयत्न सुरू आहेत. यातून २०१० पर्यंत राज्यातील दीड लाख बचत गटातील महिलांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट आहे. यशस्विनी अभियानाचे हे प्रागतिक पाऊल असून यामुळे अपेक्षित बदल दृष्टिक्षेपात येत आहे. बचतगटांमार्फत उत्पादित होणाऱ्या मालाची खात्री पटविण्यातही यामुळे यश आले आहे.

आता देशभरातील विस्तृत बाजारपेठीय दृष्टिकोनातून प्रत्येक बचतगटाचा अभ्यास करून योग्य बदल केला जात आहे. तसेच ब्रँडीगसाठीही विशेष प्रयत्न केला जात आहे. 'ग्रामरूट ते ग्लोबल' नावाने पंचसुत्री राबवली जात आहे. यासाठी पाच गोष्टी निश्चित करण्यात आल्या आहेत.

१) नवीन उद्दिष्ट, दिशा देणे.

२) जागतिक स्तरांवर ओळख बनवून बाजारपेठेत स्थान निर्माण करणे.



*धुळे येथील व्हर्चुल सेंटरमध्ये सहभागी झालेल्या बचत गटातील महिला.*



*सोलापूर येथील व्हर्च्युल सेंटरमध्ये प्रशिक्षण घेताना बचत गटातील महिला.*

३) बचत गटांच्या सध्याच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करून शास्त्रोक्त बदल सुचविणे.

४) महिलांमधील आत्मविश्वास, नेतृत्व गुण वाढविणे.

५) बचत गटांच्या सध्याच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करून शास्त्रोक्त बदल सुचविणे.

६) विविध ठिकाणी नेतृत्व व व्यक्तिमत्त्व विकास केंद्र, मार्गदर्शन केंद्राची स्थापना करणे.

७) आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी संवाद निवडक विषयांचे मार्गदर्शन.

याचाच पुढचा टप्पा म्हणजे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ सिम्बॉयासिस इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट यांच्यासाठी महाराष्ट्रातील गडचिरोली ते रत्नागिरी असा पट असलेल्या दुर्ग ते मेट्रो सिटीतील बचत गटातील महिलांना व्हर्च्युअल (आभास) सेंटरच्या माध्यमातून संवाद साधण्याचा प्रयोग यशस्वी झाला. बचत गटांच्या सर्वांगीण विकासासाठी मैलाचा दगड ठरलेल्या या उपक्रमाची सुरुवात म्हणजे महिलांना आत्मविश्वासाकडे नेण्याचे यशस्वी पाऊल ठरले आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या गडचिरोली ते रत्नागिरी येथील सुमारे ४१ व्हर्च्युल सेंटरमधून या अभिनव प्रयोगाची सुरुवात म्हणजे एका ऐतिहासिक माहिती व तंत्रज्ञान युगाची खऱ्या अर्थाने नांदी ठरली आहे. या प्रयोगात बचत गटातील ३०२४ महिलांनी सहभाग नोंदवला व आधुनिक इंटरनेट जगाशी आम्ही किती सहजपणे नातं जोडू शकतो याचाही प्रत्यय दिला. माहिती व तंत्रज्ञानाची गंगा यामुळे घरोघरी पोहोचली आहे अशी आत्मविश्वासाची ज्योतही प्रत्येक महिलेमध्ये रुजली आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विभागीय केंद्र पुण्याच्या अण्णाभाऊ साठे प्रशालेतून या उपक्रमाची सुरुवात झाली. यशस्विनी अभियानाच्या संयोजिका सुप्रिया सुळे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. पंडित पलांडे व सिम्बॉयासिस इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट संचालक डॉ. अरुण मुडबिद्री यशस्विनी अभियानाच्या मुख्य



*जळगाव येथील व्हर्च्युल सेंटरवर जमलेल्या बचत गटातील महिला.*



*दि. २२ ते २४ मे या कालावधीत सिम्बॉयासिस इन्स्टिट्युट, पुणे येथे झालेल्या 'सेल्फ कॉन्फिडन्स ॲण्ड ट्रस्ट' या प्रशिक्षणात सहभागी झालेले समन्वयक.*

समन्वयक सुरेखाताई ठाकरे यांच्या उपस्थितीत झाली.

डॉ. पंडित पलांडे यांनी व्हर्च्युअल सेंटरची ग्रामीण भागातील महिलांना असलेली गरज विशद केली. महिला कल्याणासाठी सरकार योजत असलेल्या योजनांबरोबरच तिला आजच्या काळाशी निगडीत मूलभूत गरजांमध्ये नव्या जगाची ओळख करून देणारे 'ई-माध्यम', तिचं प्रगतीचे विश्व विस्तारणारेच आहे.

या अनोख्या संवादाची सुरुवात गडचिरोलीसारख्या दुर्गम भागातील महिलांपासून झाली. यावेळी त्यांनी आपल्याला येत असलेल्या स्थानिक अडचणी, त्यांना मिळत असलेल्या सेवांमधील अभाव, बाजारपेठ व त्यांच्याकडे असलेल्या कला-कौशल्याच्या वेगळेपणाविषयी महिला मनमोकळेपणाने बोलत होत्या. बचत गटांमुळे आयुष्याला मिळालेले दिशादर्शक वळण याविषयीही त्या भरभरून बोलत होत्या. यासाठी महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील बचत गटांबरोबरच त्यांना भेडसावणाऱ्या अडचणी, पाणी प्रश्न, शिक्षण या संदर्भातही त्यांनी भाष्य केले. याचाच अर्थ महिला आजूबाजूला घडणाऱ्या घटनांकडे किती संवेदनशीलपणे बघत आहेत याचाही हा अनुभव होता. या संवादात सिम्बॉयसिस इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटच्या प्रा. संगीता डोके व प्रा. निता जोशी यांनी वस्तूंचा दर्जा, मार्केटींग पॅकेजिंग या विषयावर सिम्बॉयसिस राबवत असलेल्या प्रयोगाची माहिती दिली. कच्चा माल, वस्तूची उपयुक्तता, व्यवसायासाठी लागणाऱ्या कर्जाची प्रक्रिया व परतफेड यासंदर्भात अभ्यासपूर्ण विवेचन केले. प्रा. निता जोशी यांनी महिलांनी बाजारपेठेतील मालाविषयी असलेली ग्राहकांची मानसिकता याचाही वेध घेतला. यावेळी महिलांनी अशा प्रकारचे प्रशिक्षण वैयक्तिक पातळीवर देण्याचा आग्रह धरला. खेडे आणि महानगरातील विकासाची दरी बुजवण्याचे हे अभियान महिलांच्या विकासाला प्रेरणा देणारे व गती देणारे आहे. यावेळी सुप्रिया सुळे यांनी महिलांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे दिली व समस्यांचे निराकरण केले व त्याबाबत उपलब्ध असलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली.

यशस्विनीच्या महिलांना व्यवस्थापनाचे धडे मिळावे व ग्राहकाभिमुख दृष्टिकोन तयार होण्यासाठी तिला योग्य मार्गदर्शन होण्यासाठी सिम्बॉयसिस इन्स्टिट्युटतर्फे एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन लव्हळे ता. मुळशी, जि. पुणे येथे करण्यात आले होते. यशस्विनीच्या परिवर्तनशील वाटचालीसाठी ही कार्यशाळा दिशादर्शक ठरली. यावेळी सुप्रिया सुळे यांनी

'मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की, 'बचत गटांच्या वस्तूंना, पदार्थांना कार्पोरेट बाजारपेठ मिळण्याबरोबरच तिच्या कर्तृत्वाला व्यापक अवकाश, दिशा मिळावी हाच अशा अभ्यास व प्रशिक्षण कार्यशाळा आयोजनामागे हेतू आहे.

सिम्बॉयसिसच्या प्राचार्य तथा संचालक डॉ. विद्या येरवडेकर यांनी सिम्बॉयसिस बचत गटांच्या माध्यमातून पब्लिक सेक्टरमध्ये काम करण्यात यशस्वी होत आहे. बचत गटांचा सकारात्मक प्रतिसाद हीच आमची ऊर्जा असल्याचे नमूद केले.

यावेळी सिम्बॉयसिसच्या प्रा. संगीता डोके यांनी बचत गटांच्या प्रशिक्षणाचे नेमके स्वरूप आणि त्यातील महिलांचा सहभाग याचा परस्परसंबंध विशद केला व व्यवस्थापनातील कुठल्या घटकांचा यासाठी उपयोग करता येईल याची माहिती दिली.

सिम्बॉयसिसचे संचालक डॉ. अरूण मुडबिद्री यांचे मार्गदर्शन म्हणजे कार्यक्षमता आणि यशस्वी होण्याचा मंत्र यांचा संबंध विविध 'सक्सेस स्टोरी' च्या माध्यमातून त्यांनी समोर आणला. 'यशाचे गमक' त्यांच्या मार्गदर्शनाचे सूत्र होते.

डॉ. राहुल जोशी यांनी 'म्युझिक क्लिनीक' या अनोख्या कार्यक्रमातून 'स्वर-संवेदना आणि मन' यांचा संबंध सप्रयोग मांडत एका नव्या थेरपीचा अनुभवच महिलांना दिला. 'स्वरातून स्वास्थ्य' हेच या कार्यक्रमाचे वेगळेपण ठरावे.

'यशस्विनी' च्या महिलांसाठी सिम्बॉयसिस इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटच्या सहकार्याने 'सेल्फ कॉन्फिडन्स ॲण्ड ट्रस्ट' या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन म्हणजे कार्पोरेट क्षेत्रातील एका नव्या युगाशी जोडण्याची दिशा होती. तीन दिवसाच्या या शिबिरात महिलांना विविध खेळांच्या माध्यमातून, गट, चर्चांमधून, व्यक्तिमत्व विकासाची नवी दृष्टी मिळाली. निर्णयक्षमता, सभाधीटपणा, आत्मविश्वास यांचे अभ्यासपूर्ण प्रशिक्षणच होते. स्वतःकडे बघण्यासाठी स्वतःतले वेगळेपण शोधणारे हे शिबीर यशस्विनीच्या पुढील यशदायी वाटचालीसाठी नवा आयाम देणारे होते. शिका, मेहनत करा आणि आपल्यातले चांगले गुण दुसऱ्याला द्यायला शिका असा एकोपा जोपासणारे हे शिबीर नवी जाणीव-जागृती निर्माण करणारे होते. ध्येयाने प्रेरीत व्हा असा मंत्र म्हणजेच यशस्विनीच्या सावित्रींना गरूड झेपेकडे जाणारा स्वप्नांचा रस्ता मिळाला.

यशस्विनीच्या वस्तूंचे, मालाचे ब्रँडींग होणे किती महत्वाचे आहे आणि त्यासाठी या महिलांची बाजारपेठेत असलेल्या इतर मालाशी स्पर्धा करण्यात आम्ही तसूभरही कमी पडणार नाही याचा आत्मविश्वासही यांच्या बोलण्यातून येत होता. हा इथे आयोजित चर्चामधला महिलांचा सूर होता.



*कोल्हापूर येथील व्हर्च्युअल सेंटरमध्ये प्रशिक्षण घेताना बचत गटातील महिला.*

आजूबाजूच्या राज्यांत बचत गटांच्या विकासाविषयीचा, त्यांच्या कामाविषयी जाणून घेणे, सहकारी क्षेत्रात काम करणाऱ्या सेवा बँक, त्यांच्या इतर शाखा यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे काही व्यवस्थापन व प्रशिक्षणासंदर्भात



*बार्शी, जि. सोलापूर येथील व्हर्च्युल सेंटरमध्ये प्रशिक्षण घेताना बचत गटातील महिला.*

काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांशी चर्चा करणे व सर्वांच्या अनुषंगाने पुढील वाटचाल सुनिश्चित करणे. त्या दृष्टीने विचारमंथन व्हावे ही उद्दिष्टे 'यशस्विनीच्या अभ्यास दौरा आयोजनामागे असते. याचाच एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेला गुजरात अभ्यास दौरा आणि आंध्रप्रदेश अभ्यास दौरा यांची फलश्रुती यशस्विनीच्या वाटचालीला सुयोग्य दिशा देणारीच आहे. बचत गटांचे प्रश्न विविध प्रांतात किती सारखेच आहेत हेही या निमित्ताने महिलांना अभ्यास दौऱ्यात अनुभवायास मिळाले. नव्या समाज उन्नतीसाठी हे अभियान किती पूरक आहे याचेच हे उदाहरण आहे. नवे सामाजिक आत्मभान देणाऱ्या या चळवळीची वाटचाल समकालीन प्रश्नांना घेऊन मार्गही काढत आहे हे महत्वाचे ठरावे.

●●●



# अल्पसंख्यांकांना राष्ट्रवादीच न्याय देईल - आर. आर. पाटील



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश अल्पसंख्यांक विभागाच्या वतीने १९ ऑगस्ट २००९ रोजी औरंगाबादच्या ऐतिहासिक आमखास मैदानावर भव्य मेळाव्याचे तसेच तापडिया नाट्य मंदिरात कार्यकर्त्यांसाठी चिंतन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही कार्यक्रमांना प्रदेशाध्यक्ष आर. आर. पाटील, श्री. अरुण गुजराथी, ना. राजेश टोपे व ना. नबाब मलिक यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमांचा हा संक्षिप्त वृत्तांत.




*औरंगाबाद येथील अल्पसंख्यांकांच्या मेळाव्यात प्रदेशाध्यक्ष आर. आर. पाटील बोलत असून, व्यासपीठावर नबाब मलिक, अरुण गुजराथी, हबीब फकीह, मुनाफ हकीम व आदी मान्यवर.*

अल्पसंख्यांक समाजाला देशाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सच्चर अहवालाची पूर्णपणाने अंमलबजावणी करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अल्पसंख्यांकांना न्याय देण्याचा प्रयत्न करेल, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आर. आर. पाटील यांनी औरंगाबाद येथे दिली.

औरंगाबादच्या आमखास मैदानावर राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाच्या वतीने १९ ऑगस्ट रोजी राज्यव्यापी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याच्या उद्घाटनप्रसंगी श्री. पाटील बोलत होते. मेळाव्याला पक्षाचे ज्येष्ठ नेते अरुण गुजराथी, कामगारमंत्री नबाब मलिक, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री राजेश टोपे, अल्पसंख्यांक विभागाचे अध्यक्ष व मेळाव्याचे संयोजक हबीब फकीह, प्रदेशचे सरचिटणीस मुनाफ हकीम, सल्लागार समितीचे अध्यक्ष कमाल फारुकी, महाराष्ट्र राज्य गृहवित्त महामंडळाचे अध्यक्ष सुभाष झांबड, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष कदीर मौलाना, डॉ. गफ्फार कादरी, आमदार फौजिया खान, आमदार बाबा जानी, आमदार सतीश चव्हाण, माजी आमदार सय्यद सलीम, इकबाल पाशा, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष किशोर पाटील, शहराध्यक्ष मनमोहनसिंग ओबेरॉय, महिला आघाडीच्या शहराध्यक्षा रंजना राजपूत, सुरजितसिंग खुंगर आदीं मान्यवर उपस्थित होते.

श्री. आर. आर. पाटील पुढे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस धर्मनिरपेक्षता कधीच सोडणार नाही. पक्षाने कधीच स्वतःसाठी राजकारण केले नाही. राजकारण हे समाजासाठी आहे असे मानणारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. सच्चर समितीच्या शिफारशींना सर्वात आधी पाठिंबा दर्शविणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे पहिले नेते आहेत. अल्पसंख्यांकाच्या उन्नती संदर्भातील सच्चर समितीच्या शिफारशी लागू करण्यासाठी आपला पक्ष कटिबद्ध असून, समाजाला पूर्ण न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. वक्फ बोर्डाच्या जागा ज्या उद्देशांनी इतरांनी घेतल्या असतील त्याच कारणांसाठी वापर होत नसेल तर त्या परत घेऊन वक्फ बोर्डाला दिल्या जातील. अल्पसंख्यांक समाज शिक्षण, नोकरीत मागे आहे. उद्योग व्यवसायासाठी कर्ज मिळत नाही. या समाजाला न्याय देण्याचे काम पक्ष निश्चित करेल.

आतापर्यंत अनेक महामंडळांची कर्जे शासनाने माफ केली आहेत. अन्य महामंडळांची कर्जे माफ करण्याबद्दल आम्हाला काही म्हणायचे नाही. मात्र, त्याचबरोबर मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे कर्ज माफ व्हायला हवे अशी आमची भूमिका असून, पुन्हा सत्तेवर आल्यानंतर कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला जाईल.

आगामी विधानसभा निवडणुकीत अल्पसंख्यांक समाजाचे उमेदवार मोठ्या संख्येने दिले जातील. मात्र, उमेदवारी ही चांगल्या कार्यकर्त्याला दिली जाईल. एकाला उमेदवारी दिल्यानंतर दुसऱ्याने नाराज होता कामा नये. पक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्यांचा विचार




*राष्ट्रवादीच्या अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष हबीब फकीह मेळाव्यात बोलत असून,*
*व्यासपीठावर आर. आर. पाटील, राजेश टोपे, नबाब मलिक व इतर मान्यवर.*

करून कार्यकर्त्यांना योग्य ठिकाणी संधी दिली जाईल. मात्र आपापसातील वाद, मतभेद कार्यकर्त्यांनी संपविणे जरुरीचे आहे.

प्रत्येकालाच निवडणुकीत तिकीट मिळणे शक्य नसले तरी पक्षासाठी योगदान देणाऱ्या कार्यकर्त्याला पक्ष सोडून देणार नाहीत. मराठवाड्यातील अल्पसंख्यांक समाजाने नेहमीच धर्मनिरपेक्ष शक्तीला बळ देण्याचे काम केले आहे. येत्या विधानसभा निवडणुकीतही धर्मांध शक्तीचे अस्तित्व मिटवून धर्मनिरपेक्ष पक्षाचे अधिकाधिक उमेदवार निवडून आणण्यासाठी कार्यकर्ते प्रयत्नशील राहतील अशी मला आशा आहे. एक चांगला माणूस निवडून आला तर पूर्ण समाजावर त्याचा परिणाम होत असतो. हा अनुभव लक्षात घेऊन आपण सर्वजण चांगल्या उमेदवारांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहाल अशी मी आशा करतो.

आमखास मैदानावर झालेल्या जाहीर सभेच्या अगोदर प्रदेश अल्पसंख्यांकांच्या वतीने तापडिया नाट्यमंदिरात अल्पसंख्यांक विभागाच्या कार्यकर्त्यांसाठी चिंतन शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात मार्गदर्शन करताना श्री. आर. आर. पाटील म्हणाले की, २००४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने १३ जागा जिंकल्या होत्या, तर राष्ट्रवादी काँग्रेसला ९ जागा मिळाल्या होत्या. लोकसभेत चौथ्या क्रमाकांवर असलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष चार महिन्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर सर्वाधिक जागा जिंकून महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाचा पक्ष झाला होता. हे लक्षात ठेवून स्वबळावर निवडणुका लढण्याची भाषा करणाऱ्यांनी पाय जमिनीवर ठेवावेत.

जागा जास्त मिळाल्या म्हणून स्वबळाची भाषा करू नये, धर्मनिरपेक्ष मतांचे विभाजन होऊ नये यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष धर्मनिरपेक्ष पक्षांबरोबर आहे. आम्ही सोबत चालावे



म्हणून हात हातात दिला आहे, जर हात सोडला तर, स्वबळाची भाषा करणाऱ्यांच्या हातात काहीच राहणार नाही. धर्मनिरपेक्ष मतांचे विभाजन टाळण्यासाठी हातात हात घालून काम करण्याची गरज म्हणून आपण सोबत आहोत याला कुणी पक्षाची कमजोरी समजू नये. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सर्वच्या सर्व जागा स्वतंत्रपणे लढण्याची ताकद आहे, अशी वेळ येऊ नये अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या रक्तात धर्मनिरपेक्षता आहे. हेमंत करकरे यांच्यासारखे धाडसी अधिकारी शहीद झाले नसते तर शिवसेना-भाजपने त्यांना खलनायक ठरविले असते. मालेगाव स्फोटात साध्वी प्रज्ञासिंह, कर्नल पुरोहित यांना ताब्यात घेऊन मुस्लिमांकडे संशयाने पाहिल्या जाणाऱ्या नजरा थांबविण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने केले आहे.

उद्याचा मुख्यमंत्री कोण होईल यापेक्षा चांगल्या माणसांना जनतेने निवडून द्यावे. कारण भारतीय घटनेवर ज्यांचा विश्वास नाही अशांना सत्तेपासून दूर ठेवण्याचे काम आता लोकांनीच करावे. असे आव्हानही श्री. पाटील यांनी यावेळी केले.

मुस्लिमांनी शिक्षणात सहभाग घेऊन समाजाचा विकास साधावा यासाठी खास महिलांकरिता राज्यात २५ आयटीआय नव्याने सुरू केल्या जातील, अशी घोषणा राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री श्री. राजेश टोपे यांनी यावेळी केली. श्री. टोपे पुढे म्हणाले की, मुस्लिम समाज या देशातील एक मोठा घटक आहे. या समाजात शिक्षणाचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे निश्चितच कमी आहे. मुस्लिमांचा शैक्षणिक विकास व्हावा यासाठी २०० कोटी रुपये देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. विशेषतः महिलांना शिक्षणाची संधी मिळावी आणि त्यांना रोजगार उभा करता यावा यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने महिलांसाठी आयटीआय काढण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

या राज्यातील सत्ता ही केवळ मुस्लिमांमुळेच आली आणि पुढेही येणार असे सांगून ते म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसला बळकटी आणण्यासाठी मुस्लिमांनी प्रयत्न करणे ही काळाजी गरज आहे.

मुस्लिम समाजाला शिक्षण, आरक्षण आणि संरक्षणाची गरज असल्याचे सांगून, आमदार फौजिया खान म्हणाल्या की, मुस्लिम समाजाचा आवाज लोकसभा आणि विधानसभेत पोहोचला पाहिजे. त्यासाठी या समाजाला आरक्षणाची गरज आहे.

आपल्या प्रास्ताविक भाषणात अल्पसंख्यांक विभागाचे अध्यक्ष हबीब फकीह म्हणाले की, महात्मा ज्योतिबा फुले यांनी सार्वत्रिक व मोफत शिक्षणाची मागणी केलेल्या घटनेला आता १०० वर्षांहून अधिक काळ गेला आहे. परंतु शिक्षण क्षेत्रात परिवर्तनाच्या दिशेने अजूनही संथ गतीनेच प्रगती होत आहे.



*औरंगाबादला अल्पसंख्यांक समाजाच्या मेळाव्याला जमलेले राष्ट्रवादीचे कार्यकर्ते.*



*हबीब फकीह*

आजच्या राजकारणातही महात्मा ज्योतिबा फुले यांचा विचार केंद्रस्थानी ठेवून आपण न्याय व समता या मूल्यांना अधिक महत्त्व देण्याची गरज आहे. असाच निष्कर्ष न्या. राजेंद्र सच्चर समितीच्या अहवालातून स्पष्ट होतो. आपल्या राज्यघटनेतही १४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद केली आहे. पण ५० वर्षांचा काळ लोटला तरी आपल्याला अपेक्षित यश आले नाही. शिक्षण हा नागरिकांचा मूलभूत हक्क असे मान्य करणारे शिक्षण विधेयकही २००५ साली सर्वानुमते मान्य आहे. तथापि अजूनही सार्वत्रिक शिक्षणाच्या उद्दिष्टांकडे वेगाने वाटचाल करणे आवश्यक आहे.

भारतीय लोकसंख्येचा मोठा भाग असणाऱ्या १५ कोटी मुस्लिम बांधवांच्या शैक्षणिक मागासलेपणाचा विचार महत्त्वाचा असून राष्ट्रीय विकासात त्यांचा असलेला सहभागी अधिक प्रभावीपणे लक्षात घ्यायला हवा.

आज मुस्लिम समाजातील निरक्षतेचा प्रश्न एक राष्ट्रीय प्रश्न म्हणून साऱ्याच राजकारण्यांनी व समग्र भारतीय जनतेने मनावर घ्यायचा प्रश्न बनला आहे. त्यासाठी सच्चर समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी तातडीने व उत्तम प्रकारे व्हावी, यासाठी प्रत्येक धर्मनिरपेक्ष नागरिकाने झटायला हवे. व्यापक राष्ट्रहितांच्या या कामात आपण सर्व सहभाग झालो तरच उदयाच्या अभ्युदयाची स्वप्ने प्रत्यक्षात येतील.

राज्याचे श्रममंत्री नबाब मलिक म्हणाले की, सच्चर अहवालावर अंमलबजावणी करण्यासाठी राज्य व केंद्रीय सरकारांना कृती करण्यासाठी देशभर जनआंदोलन छेडण्याची आवश्यकता आहे. धर्मनिरपेक्ष आंदोलन केवळ मुसलमानांचे नाही. आर्थिक राजकीय मागासलेपण दूर करणे आणि मुसलमानांना राजकीय अधिकार देण्याचा मुद्दा केवळ मुसलमानांचाच नाही तर राष्ट्रीय समस्या असल्यामुळे अशा प्रकारच्या आंदोलनाची अनिवार्यताच व यशस्वीतेसाठी हे ध्यानात घेणे जरुरीचे आहे. त्याचप्रमाणे सर्वधर्मीय, धर्मनिरपेक्ष व लोकतांत्रिक संघटना समूह व व्यक्तींनी मोठ्या उत्साहाने या आंदोलनात भाग घेण्याची आवश्यकता आहे.

यावेळी झालेली इतर मान्यवरांची भाषणे थोडक्यात पुढीलप्रमाणे :

## मुनाफ हकीम, सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस :

मुस्लिमांच्या विकासासाठी कुठेही धोरण नाही. वक्फ बोर्डाच्या जमिनी बिल्डरर्सनी लाटल्या आहेत. त्या परत करणे आवश्यक असून, त्याविषयी व मुस्लिमांच्या विकासाबद्दल कुणीच स्पष्टपणे बोलत नाही. किमान या जमिनी तरी मुस्लिमांना दिल्या पाहिजेत. १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर सात महानगरपालिकांमध्ये अल्पसंख्याकांना न्याय मिळाला पण त्यानंतर मात्र त्यांना कोणीही फारशी संधी देत नाही असे निदर्शनास आले आहे.

## गफार मलिक, सचिव अल्पसंख्याक विभाग :

ग्रामीण भागात अल्पसंख्यांक समाजाला पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिकांमध्ये योग्य ते प्रतिनिधीत्व आजही मिळत नाही. ही आमची खंत आहे. तसेच सरकारी महामंडळांवर नियुक्ती करताना ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांना प्राधान्याने संधी देण्याची आवश्यकता आहे. केंद्र व राज्य सरकारने अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या योजना जाहीर केल्या आहेत. परंतु त्यांची माहिती अल्पसंख्यांक समाजापर्यंत फारशी पोहोचत नसल्याने विद्यार्थी त्या योजनेचा लाभ घेऊ शकत नाही. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने या योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम वेगाने हाती घेतले पाहिजे.

## मसूद शेख,

**जिल्हाध्यक्ष, उस्मानाबाद, अल्पसंख्यांक विभाग**

महाराष्ट्र शासनाने न्यायमूर्ती सच्चर समितीच्या अहवालाची अंमलबजावणी करण्यासाठी जी समिती नेमली त्यावर अध्यक्ष म्हणून मेहमूद रहेमान या उत्तर प्रदेशातील सनदी अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. या अधिकाऱ्याने महाराष्ट्र राज्यात कधीही काहीही काम केलेले नाही किंवा त्यांना मराठी भाषेचे कुठलेही



*औरंगाबादच्या अल्पसंख्यांक मेळाव्यात श्रममंत्री नबाब मलिक बोलत असून व्यासपीठावर पक्षाचे सर्व मान्यवर पदाधिकारी.*

ज्ञान नाही. त्यामुळे वरील अहवालात त्यांना योग्य त्या शिफारशी करता आल्या नसल्यामुळे सच्चर समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यास १ वर्ष उशीर झाला आहे. त्याची योग्य ती दखल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी घेऊन सदर समितीच्या शिफारशींचा फायदा अल्पसंख्यांक जनतेला त्वरित मिळण्यासाठी प्रयत्न करावेत आणि महाराष्ट्राच्या अल्पसंख्यांक समाजाची जाण असणाऱ्या महाराष्ट्रीयन व्यक्तीची समितीवर नेमणूक करावी.

## जब्बार खान, अध्यक्ष नवी मुंबई :

अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी असलेल्या विविध योजनांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होण्यासाठी सर्व महापालिकांमध्ये अल्पसंख्यांक कल्याण विभाग स्थापन करून स्वतंत्र अध्यक्ष नेमण्यात यावा. मागासलेल्या मुस्लिम समाजाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी नोकरी, शिक्षण व राजकीय सत्तेमध्ये मुस्लिम समाजास १० टक्के आरक्षण देण्यात यावे.

## मो. मतीन यु.खान, अध्यक्ष औरंगाबाद शहर :

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्यामार्फत अल्पसंख्यांक समाजास देण्यास येणाऱ्या आर्थिक सहाय्यातील अटी काढून टाकाव्यात. अल्पसंख्यांक सेलचा महाराष्ट्राचा अध्यक्ष हा पार्लमेंटरी वॉर्डाचा सदस्य असावा. त्या धर्तीवर जिल्हा व शहर अध्यक्ष सुद्धा पार्लमेंटरी वॉर्ड सदस्य असावा. खैरलांजी प्रकरणातील आरोपींवरील कारवाई जशी मागे घेण्यात आली त्याप्रमाणे बाबरी मस्जिद प्रकरणातील मुस्लिम आरोपीवरील कारवाई सुद्धा मागे घेण्यात यावी.

## मो. हाजी कलाम, सहसचिव :

सहकार क्षेत्रात मुस्लिम समाजास आरक्षण देण्यात यावे व महाराष्ट्रामध्ये मदरसा बोर्डाची स्थापना करण्यात यावी.

## प्रा. एन. बी. शेख, औसा, जि. लातूर :

मराठवाड्यातून राष्ट्रवादी काँग्रेसचे जास्तीत जास्त आमदार निवडून आणण्यासाठी अल्पसंख्यांकांनी मोठी मेहनत व मदत करण्याची आवश्यकता आहे. श्री. हबीब फकीह हे अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष झाल्यापासून कामाला खूप गती आली आहे. त्यांनी अर्थमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्याबरोबर चर्चा करून व बैठक लावून २०० कोटींच्या निधींची मागणी अल्पसंख्यांकांसाठी केली होती. त्यामुळे आता मदत मिळणे सुकर झाले आहे.

●●●




# भाजपापुढे नेतृत्वाचे 'धर्मसंकट' अन् विरोधकांचे तीन तेरा

**- विजय नाईक, नवी दिल्ली**

**भाजपच्या नेतृत्वाचे वयोमान ५५ ते ६० वर्षे असावे, असा सल्ला सरसंघचालक मोहन भागवत यांनी दिला. त्यात भर पडली ती माजी सरसंघचालक सुदर्शन यांनी जसवंत सिंग यांच्या भूमिकेला दुजोरा देत, ''महात्मा गांधी व नेहरू हे फाळणीला जबाबदार होते,'' असे सांगितल्याने व जिन्ना यांचे 'धर्मनिरपेक्ष' असे वर्णन केल्याने. परिणामतः भाजप पराकोटीचा खिळखिळा झालाय. ''तो एकसंध राहाणार की, तुकडे होणार?'' असा प्रश्न राजकीय वर्तुळातून विचारला जातो. शिस्तभंगाच्या कितीही कारवाया केल्या, तरी नेतृत्वावर झालेले हल्ले पुसले जाणार नाही. पराभवाचे प्रायःचित्त करून ज्येष्ठ नेत्यांनी पदत्याग केल्याशिवाय पक्षांतर्गत बंडाळी संपुष्टात येणार नाही, असे स्पष्ट दिसते.**

देशात दुष्काळ पडलाय, पण सत्तारूढ काँग्रेसला राजकीयदृष्ट्या सुगीचे दिवस आलेत. भारतीय जनता पक्षामध्ये 'महाभारत' सुरू झाल्याने त्यातील सारे 'रामभक्त' (नेते) कुरूक्षेत्रावर उभे असून, वाग्बाणांच्या रात्रंदिवस झडणाऱ्या फैरींनी घायाळ झालेत. अधिकारांची कवचकुंडले तथाकथित लोहपुरूष लालकृष्ण अडवानी व पक्षाध्यक्ष राजनाथ सिंग यांच्यासाठी कुचकामी ठरलीत. पराभवाची मीमांसा करण्यासाठी सिमला येथे बोलाविण्यात आलेली 'चिंतन बैठक' 'चिंताग्रस्तांची बैठक' ठरली. तीवर जसवंत सिंग यांच्या जिन्नांवर लिहिलेल्या पुस्तकाचे दाट सावट पसरले.

१५ व्या लोकसभेतील पराभवाच्या धक्क्यातून पक्ष उभारू पाहातोय, तोच यशवंत सिन्हा, जसवंत सिंग, अरूण शौरी, वसुंधरा राजे, सुधींद्र कुलकर्णी, गोविंदाचार्य, भुवनचंद्र खंडुरी आदींनी एकामागून एक तोफा डागल्या. दुसरीकडे सरसंघचालक मोहन भागवत यांनी 'द टाईम्स ऑफ इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीत, ''युवा नेतृत्वाला वाट करून द्या,'' असा सल्ला देऊन अडवानी यांना ''पद सोडा'' असा गर्भीत इशारा दिला. ''भाजपच्या नेतृत्वाचे वयोमान ५५ ते ६० वर्षे असावे,'' असा सल्ला त्यांनी दिला. त्यात भर पडली, ती माजी सरसंघचालक सुदर्शन यांनी जसवंत सिंग यांच्या भूमिकेला दुजोरा देत, ''महात्मा गांधी व नेहरू हे फाळणीला जबाबदार होते,'' असे सांगितल्याने व जिन्ना यांचे 'धर्मनिरपेक्ष' असे वर्णन केल्याने.


महात्मा गांधी व जीना

परिणामतः भाजप पराकोटीचा खिळखिळा झालाय. ''तो एकसंध राहाणार की, तुकडे होणार?'' असा प्रश्न राजकीय वर्तुळातून विचारला जातो. शिस्तभंगाच्या कितीही कारवाया केल्या, तरी नेतृत्वावर झालेले हल्ले पुसले जाणार नाही. पराभवाचे प्रायःचित्त करून ज्येष्ठ नेत्यांनी पदत्याग केल्याशिवाय पक्षांतर्गत बंडाळी संपुष्टात येणार नाही, असे स्पष्ट दिसते.

संदर्भादाखल थोडे इतिहासाकडे पाहू. अडवानी यांनी २००५ मध्ये भाजपच्या अध्यक्षपदी व विरोधीनेतेपदी असताना ३० मे ते ५ जून दरम्यान पाकिस्तानला भेट दिली होती. त्यावेळी ४ जून रोजी कराची येथील कायदे आझम जिन्ना यांच्या स्मारकाला दिलेल्या भेटीत नोंदवहीत केलेल्या टिप्पणीने भाजप व रास्वसंघात प्रचंड वादंग माजले होते.

अडवानी यांनी त्यावेळी बलुचिस्तानमधील हिंगलज माता मंदिर व लाहोरमधील कटास राज मंदिराला भेट दिली होती. जिन्ना यांच्या स्मारकातील नोंदवहीत अडवानी यांनी लिहिले होते, '' स्वातंत्र्यसेनानी सरोजिनी नायडू यांनी जिन्नांना 'हिंदु मुस्लिम ऐक्याचे राजदूत' म्हटले होते. ११ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तानच्या घटनात्मक विधिमंडळापुढे केलेल्या भाषणात त्यांनी धर्मनिरपेक्ष राष्ट्राचा प्रभावी पुरस्कार केला होता. त्या महान नेत्याला माझी भावपूर्ण आदरांजली.'' या टिप्पणीमुळे त्यांना भाजपचे अध्यक्षपद सोडावे लागले.

हे येथे नमूद करण्याचे करण्याचे कारण म्हणजे, अडवानी यांच्या पाठोपाठ जसवंत सिंग यांनीही २१ जानेवारी २००६ रोजी दिल्लीतील प्रेस क्लबमध्ये पत्रकार परिषद घेऊन हिंगलज माता मंदिर व जिन्नांचे स्मारक यांना भेट देण्याची घोषणा केली. ''अडवानी यांच्याबाबत झालेल्या वादंगानंतरही आपण स्मारकाला भेट देणार काय,'' असा प्रश्न विचारता, ते म्हणाले होते, ''महात्मा गांधी यांच्या समाधिला जसे लोक भेट देतात, तसेच मी जिन्नाच्या स्मारकाला भेट देणार आहे. ते पाकिस्तानचे कायदे आझम आहेत. तेव्हा पाहुणा म्हणून मी माझे कर्तव्य पार पाडणार.'' यामुळे वादळ निर्माण होणार काय? असे विचारता ते म्हणाले होते, ''मला वाटत नाही, मी तीर्थयात्रेवर निघालो आहे.'' जिन्ना धर्मनिरपेक्ष नेते होते काय, या प्रश्नावर जसवंत सिंग यांचे उत्तर होते, ''ते मी योग्य वेळी सांगेन.'' मुन्नाबाव खोक्रापार मार्गेपाकिस्तानात जाऊन त्यांनी हिंगलज माता मंदिर तसेच शहाबाज कलंदर याच्या मझारीला भेट देऊन आदरांजली वाहिली,

तथापि, जिन्ना यांच्या स्मारकाला भेट देण्याचे त्यांनी टाळले. कारण त्यांच्या पत्रकार परिषदेचे वृत्त पसरले, तसे रास्व संघ व पक्षात चलबिचल सुरू झाली व त्यांनी जिन्ना यांच्या स्मारकाला भेट दिल्यास त्यांचे राज्यसभेतील विरोधीपक्ष नेतेपदही धोक्यात येईल, असे सांगितले जाऊ लागले.

किंबहुना याची कुणकुण त्यांना यात्रेदरम्यान लागली व त्यांनी जिन्नांच्या स्मारकाला भेट देण्याचे रद्द केले. वस्तुतः नऊ दिवसांच्या पाकिस्तान भेटीत तब्बल चार दिवस ते मझारी नजिक राहिले होते. त्या काळात रास्व संघाचे अध्यक्षपद सुदर्शन यांच्याकडे होते. अडवानी यांना अध्यक्षपदाचा राजीनामा देण्यास त्यांनी भाग पाडले. आश्चर्य म्हणजे, हेच सुदर्शन आता वेगळ्या सुरात बोलू लागलेत. ''जिन्ना धर्मनिरपेक्ष व सच्चे भारतीय राष्ट्रवादी होते,'' असे विधान त्यांनी २५ ऑगस्ट रोजी भोपाळहून केले.

''देशाच्या विभाजनाला गांधी यांची नेहरूंवरील मर्जी जबाबदार होती. गांधी वारंवार जिन्ना यांचा अपमान करीत होते.'' असाही आरोप त्यांनी केला.

अडवानी यांनी अध्यक्षपद सोडल्यावर जिन्नांचे 'जिन' पुन्हा बाटलीत



सरदार वल्लभभाई पटेल व पंडित जवाहरलाल नेहरू



*जसवंतसिंग, राजनाथसिंग आणि लालकृष्ण अडवानी हे तिघे आता पुन्हा एकत्र कधी दिसतील?*

बंदिस्त झाल्याची भावना सर्वत्र पसरली होती. लोकसभेतील पराभवामुळे भाजप जर्जर झाला होता. तोच जसवंत सिंग यांनी 'जिन्ना-इंडिया-पार्टीशन-इंडिपेन्डन्स'हे पुस्तक लिहून ते पुन्हा वर काढले. भाजपच्या मानगुटीवर बसलेला हा पुस्तकरूपी वेताळ लौकर उतरण्याची शक्यता दिसत नाही.

''ज्या प्रकारे गेले काही महिने आरोप-प्रत्यारोप होत आहेत, त्यावरून भाजपमध्ये केवळ कुणाचा पायपोस कुणाला राहिलेला नाही, तसेच ''अधिकारवाणीने बोलणारे व त्यांचे ऐकणारे कुणी उरलेले नाही (पार्टी विदाऊट एनी ऑथॉरिटी),'' अशी प्रतिक्रिया एका निरिक्षकाने व्यक्त केली. लोकसभेतील पराभवाची जबाबदारी घेऊन अद्याप एकाही ज्येष्ठ नेत्याने राजीनामा दिलेला नाही.

अडवानी यांनी तो देऊ केला होता. परंतु पक्षाने समजूत घालताच, (पडत्या फळाची आज्ञा मानून) विरोधी पक्षनेतेपदी पुढील पाच वर्षे राहाण्याचीही तयारी दर्शविली. त्यामुळे अडवानी, राजनाथ सिंग व अरूण जेटली या तीन नेत्यांवर यशवंत सिन्हा, अरूण शौरी, जसवंत सिंग आदी नेते अतिशय नाराज झाले. पराभवाची जबाबदारी सामुहिक असेल, तर या तिन्ही नेत्यांनी राजीनामे द्यावयास हवे होते. राजनाथ सिंग यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाल येत्या डिसेंबरात संपुष्टात येत आहे.

परंतु तत्पूर्वीच त्यांना पद सोडण्याची वेळ येणार, असे भाजपच्या गोटातून बोलले जाते. पराभवाची चिरफाड करणारी जी वक्तव्ये व पत्रोपत्री झाली, त्यातूनही बव्हंशी दोष, जाहीरपणे या तीन नेत्यांना तसेच वरूण गांधी यांनी अल्पसंख्याकविरोधी केलेल्या प्रक्षोभक वक्तव्यांना देण्यात आला. भाजपमध्ये शहानवाज हुसेन व उपाध्यक्ष मुक्तार अब्बास नकवी हे दोन अल्पसंख्याक नेते आहेत. त्यापैकी हुसेन माजी केंद्रीय मंत्री आहेत. वरूण गांधी यांच्या सावलीलाही ते उभे राहात नाही. संसदेचे अधिवेशन चालू असता, एकदा वरूण गांधी संसदेच्या प्रमुख प्रवेशद्वारातून बाहेर पडत होते. जवळच शहानवाज हुसेन उभे होते. परंतु वरूण गांधी यांना पाहातच ते तोंड वळवून दूर कोपऱ्यात गेले.

जवळच मी उभा होतो. त्यांना विचारता, ते म्हणाले, ''मी त्यांच्याबरोबर बाहेर पडलो असतो, तर माध्यमांनी आमच्या दोघांची भरमसाठ छायाचित्रे काढली असती, प्रश्नांच्या फैरी झडल्या असत्या. त्याचे भलतेच अर्थ काढले गेले असते. हे सारे मला नको आहे.'' अडवानी व राजनाथ सिंग यांनी वरूण गांधी यांच्यावर कोणतीही कारवाई न करता, त्यांना समज न देता, दिलेला पाठिंबा या दोन्ही नेत्यांना खपलेला नाही. त्यामुळे



*पुस्तकाच्या रुपाने वादळ उभे राहिल्यानंतर पत्रकार परिषदेत बोलताना जसवंतसिंग*

तेही नाराज आहेत.

आपण जिन्ना यांच्यावर पुस्तक लिहितोय, याची कल्पना भाजपच्या नेत्यांना दिली होती, असे जसवंत सिंग यांनी अलीकडे एका मुलाखतीत सांगितले. परंतु ते प्रकाशित करण्याची वेळ मात्र त्यांनी साधली, ती नेमकी सिमला येथे झालेल्या चिंतन बैठकीपूर्वी. त्यामुळे बैठकीतील पराभवाच्या मीमांसेवर पाणी पडले. उलट जसवंत सिंग व त्यांचे पुस्तक हा एकमेव वादग्रस्त विषय समोर येऊन, त्यांची पक्षातून हकालपट्टी केल्याची घोषणा राजनाथ सिंग यांनी केली.

''सिमल्याच्या बैठकीला उपस्थित राहू नका,'' असे कळविण्यात आले. जसवंत सिंग, अटल बिहारी वाजपेयी यांच्या निकटवर्तीय गोटातील ज्येष्ठ नेते. 'एनडीटीव्ही'ला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी त्यांच्यावर कंदाहारच्या संदर्भात असलेला दहशतवाद्यांना 'इमाने इतबारे' नेण्याचा (एस्कॉर्ट करण्याचा) आरोप धुवून काढला, तसेच अडवानी यांना त्याबाबत काही माहिती नव्हती, हा दावाही फोल ठरविला. '' मी अडवानी यांना पाठीशी घातले.(आय कव्हर्ड फॉर हिम (अडवानी).'' असा गौप्यस्फोट केला.

दुसरी घटना गुजरातमध्ये झालेल्या अल्पसंख्याकांच्या शिरकाणाची. पक्षाच्या सम्मेलनासाठी गोव्याच्या वाटेवर असताना विमानात हा विषय निघाला, तेव्हाही मोदींना पदावरून हटविण्यास अडवानी यांनी नकार दिल्याचे जसवंत सिंग यांनी सांगितले. त्यामुळे भाजपच्या कपाटातील एकएक सांगाडा रोज बाहेर पडू लागला. जसवंत सिंग यांनी विभाजनासाठी सरदार पटेल यांना दिलेला दोष, अडवानी, मोदी, राजनाथ सिंग व अन्य नेत्यांना खपला नाही. त्यामुळे त्यांच्यावर कोणतीही कारणे दाखवा नोटीस न देता, तडकाफडकी कारवाई करण्यात आली. एका निरिक्षकानुसार, ''नेहरू, पटेल या काँग्रेस नेत्यांवर त्यांनी चढविलेला हल्ला पाहाता, त्याचे भाजपने स्वागत करावयास हवे होते. कारण स्वातंत्र्योत्तर काळातील पहिली काही वर्ष वगळता काँग्रेस पक्ष भारतीय जनसंघ व नंतरच्या भाजपचा राजकीय विरोधक राहिला आहे.

जसवंत सिंग यांनी पुस्तक लिहून पक्षाचीच भूमिका अधिक प्रखरपणे पुढे आणली. असे असताना त्यांच्यावर कारवाई कशासाठी? भाजपचे आदर्श नेते वीर सावरकर, हेडगेवार, दीन दयाल उपाध्याय, डॉ शामा प्रसाद मुकर्जी हे आहेत. नेहरू, पटेल नव्हे.'' धर्मांध व विभाजनाचे सूत्रधार असलेले जिन्ना, अडवानी व जसवंत सिंग यांच्यासाठी एकाएकी धर्मनिरपेक्ष व

महान नेते झाले कसे? रास्व संघाचे नेते एच. व्ही. शेषाद्री यांनीही आपल्या पुस्तकात पटेल यांना विभाजनासाठी दोषी ठरविले. त्या पुस्तकावर गुजरातमध्ये बंदी नाही, व जसवंत सिंग यांच्या पुस्तकावर बंदी, हे कसे? पुस्तक प्रकाशन समारंभावर १७ ऑगस्ट रोजी भाजप नेत्यांनी बहिष्कार टाकला, त्यावेळीच त्यांच्याविरूद्ध पक्षातील भडकलेल्या भावनांची प्रचिती आली. समारंभाला उपस्थित असलेल्या राम जेठमलानी, लॉर्ड मेघनाद देसाई यांनी सिंग यांच्या विचाराशी सहमती दर्शविली, तर बी.जी. वर्गीस व एम.जे. अकबर यांनी नेहरूंच्या भूमिकेचे समर्थन केले. स्वातंत्र्याचा इतिहास, त्यातील नेत्यांच्या भूमिका याबाबत इतिहासाकारांमध्ये तीव्र मतभेद आढळतात. त्यात गेल्या अनेक वर्षांत बरेच राजकारण व दृष्टिकोन घुसल्याने वादंग माजते. परराष्ट्र राज्यमंत्री डॉ शशी थरूर यांनी 'इंडियन असोसिएशन ऑफ फॉरेन अफेअर्स करस्पाँडंट'ने २९ जुलै रोजी आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना सांगितले, ''जसवंतसिंग यांनी इतिहासाचा आणखी एक पैलू समोर आणला. तो कुणाला मान्य नसेल, तर भाजपतील विचारवंतांनी त्याचे खंडन करणारा आणखी एक ग्रंथ लिहावा, परंतु ज्या तऱ्हेने जसंवतसिंग यांना खलनायक बनविण्यात आले, ते लोकशाही विचारसरणीला धरून नाही.''



*अरूण शौरी व सुधेंन्द्र कुलकर्णी*

अरूण शौरी यांनी काही वर्षांपूर्वी घटनाकार बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत लिहिलेल्या पुस्तकाने असेच वादळ उठविले होते. खुशवंत सिंह यांनी केलेल्या शिवरायाच्या अवहेलनेने महाराष्ट्राच्या भावना दुखावल्या होत्या.

उलटपक्षी, जसवंत सिंग यांच्या पुस्तकाने त्यांना पाकिस्तानमध्ये हीरो बनविले असून, रास्वसंघाचा मिळालेला पाठिंबा पाहाता, भाजपच्या नेत्यांची मनस्थिती द्विधा झाली.

२००६ मध्ये जसवंत सिंग यांनी जिन्नांच्या स्मारकाला भेट देण्याचे ठरविले, त्यावेळी जनतेतूनही तीव्र भावना व्यक्त करण्यात आल्या होत्या. एकाने म्हटले होते, ''जसवंत सिंग यांनी आता महम्मद गझनवी, महंमद घोरी व चेंगीज खान यांच्या थडग्यांना भेट देऊन श्रद्धांजली वाहावी.'' दुसऱ्याने म्हटले होते, ''जसवंत जस्ट रिमेन इन पाकिलँड.'' जसवंत सिंग यांनी भाजपची तुलना जर्मनीतील 'कू क्लस्क क्लान' या वंशवादी अतिरेकी सांप्रदायाबरोबर करण्याचेही सोडले नाही. त्यांनी भाजपला 'फासिस्ट' म्हणण्याचेच बाकी ठेवले आहे. अरूण शौरी यांनी राजनाथ सिंग यांना 'हम्टी डम्टी ॲलिस इन ब्लंडरलँडम अशी उपाधी देऊन कहर केला. परंतु, पक्षाचे एकामागून एक बुरूज ढासाळू लागल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात पक्षाने हात आखडता घेऊन केवळ स्पष्टीकरण विचारले.

लोकसभेच्या निवडणुकीत उत्तराखंडमध्ये आलेल्या अपयशाची जबाबदारी मुख्यमंत्री भुवनचंद्र खंडुरी यांच्यावर टाकून त्यांना पद सोडण्यास सांगण्यात आले. राजस्तानातील पराभवाचे खापर माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांच्यावर फोडण्यात आले. पण केंद्रातील कोणताही नेता जबाबदारी घेताना दिसला नाही. म्हणूनच राजे यांनी केलेल्या विरोधाला बंडाचे स्वरूप आले. वस्तुतः भारतीय जनता पक्ष सत्तारूढ आघाडीच्या खालोखाल लोकसभेत ११६ सदस्य असलेला सर्वात मोठा पक्ष आहे. त्यामुळे भाजपला निराशेच्या गर्तेत जाण्याची गरज नव्हती. पराभवामुळे नेत्यात मवाळपणाही आला होता.

त्याचं प्रतिबिंब नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पडलं, ते भाजपच्या सकारात्मक विरोधी भूमिकेमुळे. पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग व अडवानी यांच्यात बऱ्याच प्रमाणात सलोखा दिसला. यशवंत सिन्हा यांनी पक्षावर जाहीर टीका केल्यानंतर ''नेत्यांनी आपले विचार केवळ पक्षाच्या मंचावर मांडावे,'' असे सांगूनही अरूण शौरी व सिन्हा यांनी हल्ला संपुष्टात आणला नाही. त्यामुळे पक्ष अधिकच 'पारदर्शी' असल्याचे दिसू लागले. राजनाथ सिंग व अडवानी यांची अधिकारक्षमताही



आहेत. भारतीय लोकशाहीत आजवर काँग्रेस अथवा भाजप हेच केंद्रस्थानी सत्तेवर राहिलेले तुल्यबळ पक्ष आहेत. 'एडिटर्स गिल्ड ऑफ इंडिया'च्या २८ ऑगस्ट रोजी झालेल्या अनौपचारिक वार्तालापात अर्थमंत्री प्रणब मुकर्जी यांनी भाजपमधील वादळावर बोलताना सांगितले, की भाजप हा एकमेव पक्ष खऱ्या अर्थाने संसदीय परिभाषेत विरोधी पक्ष आहे. लोकसभेत विरोधी पक्षाचा दर्जा प्राप्त करण्यास किमान पंचावन्न सदस्यांची गरज असते. ती संख्या भाजप व्यतिरिक्त कोणताही पक्ष अद्याप मिळवू शकलेला नाही.

भाजप प्रमाणेच तथाकथित तिसऱ्या आघाडीतील समाजवादी पक्ष, बहुजन समाजपक्ष, राष्ट्रीय जनता दल, लोकतांत्रिक समाजवादी पक्ष, डावी आघाडी यात नैराश्य

घटल्याचे दिसू लागले. त्यातूनच पुढे हल्ल्याप्रतिहल्ल्याची आतिषबाजी सुरू झाली.

दरम्यान रास्वसंघाचे सरसंचालक मोहन भागवत यांच्या दिल्लीत २९ ऑगस्ट रोजी झालेल्या पत्रकार परिषदेने एक गोष्ट स्पष्ट झाली, की सैरभैर झालेल्या भाजपवर येथून पुढे संघाची पकड अधिक व कायमची बळकट होणार. संघाच्या नेतृत्वाला काही प्रमाणात आव्हान देण्याची क्षमता फक्त अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवानी यांच्यात होती.

तथापि, यापुढे भाजपचा कोणताही नेता जाहीरपणे संघाच्या विरूद्ध बोलू शकणार नाही. ''भाजपमधील सावळा गोंधळ आटोपता घ्या,'' असा संदेश देतानाच ''पक्ष राखेतूनही पुन्हा उभा राहील,'' असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. याचा अर्थ, पक्षाची 'राखरांगोळी' झाल्याचीही कबुली त्यांनी दिली. ''मी कुणाला सल्ला देत नाही, विचारल्यास देईन,'' असे त्यांनी सांगितले. पत्रकार परिषदेपूर्वी भाजप अध्यक्ष राजनाथ सिंग यांनी त्यांची भेट घेतली. नंतर दिल्लीतील 'केशवकुंज' या मुख्यालयात भागवत यांना भेटण्यासाठी अरूण जेटली, सुषमा स्वराज, व्यंकैय्या नायडू आदी नेत्यांची रीघ लागली.

अडवानी यांच्या निकटवर्तीय गोटातून, ''अडवानी यांना विरोधीपक्ष नेतेपद सोडावे लागणार नाही,'' असेच अद्याप सांगितले जात असले, तरी या पदाची पताका त्यांना सुषमा स्वराज अथवा अन्य नेत्याकडे लौकरच सोपवावी लागेल, अशी चिन्हे दिसतात. जेटली हे राज्यसभेत पक्षाचे व विरोधी पक्षनेते

पसरले. सरकारला पाठिंबा देऊनही राष्ट्रीय जनता दलाला केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने लालू प्रसाद नाराज झाले. संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये गप्पा करताना ते सरकारला सतत शिवराळ भाषेत लाखोली वाहात असतात. निवडणुकीनंतर उड्या मारणारे अजित सिंग यांचा सध्या ठावठिकाणा नाही. हरियानात भाजपने ओमप्रकाश चौताला यांच्या लोकतांत्रिक पक्षाला ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात सोडचिठ्ठी दिल्याने भाजपला एकट्याने विधानसभेच्या निवडणुकीत उतरावे लागणार आहे. तेथे चौताला विरूद्ध मुख्यमंत्री भूपेंद्र हुडा विरूद्ध भजनलाल विरूद्ध बसपा यांच्यात चौरंगी लढत होईल.

महाराष्ट्रात भाजपचे उपाध्यक्ष गोपिनाथ मुंडे व नितीन गडकरी यांच्यातील जाहीर मतभेदांमुळे व केंद्रीय पक्षात बेबंदशाही माजल्याने शिवसेना शिरजोर ठरणार यात शंका नाही. शिवसेना विधानसभेतील २८८ पैकी दोनशे जागांवर तिकिटासाठी दावा करीत आहे, यावरून ते सिद्ध होते. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात युती झाली, तरच सध्याच्या युतीला पुन्हा सत्तेत येण्याची संधि मिळेल. ''विधानसभेच्या निवडणुका सोप्या नाही,'' असे राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी नुकतेच सांगितले. लोकसभेच्या निवडणुकीत झालेल्या चुका दुरूस्त करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला आहे.

तथापि, काँग्रेसचे सरचिटणीस दिग्विजय सिंग व माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी 'एकला चलो रे' चा घोषा चालविल्याने पक्षाध्यक्ष सोनिया गांधी यांनी एकत्र निवडणूक

लढविण्यास ऑगस्ट अखेर तरी हिरवा कंदिल दाखविला नव्हता. यावेळी रिपब्लिकन पक्षाबरोबर समाजवादी, शेकापसह अन्य सतरा पक्षांनी आवळ्याभोपळ्याची मोट बांधून कॉंग्रेस-राष्ट्रवादी व भाजप-शिवसेनेला तिसरा पर्याय उभा करण्याचे प्रयत्न चालविले आहेत. त्या भारीप बहुजनमहासंघाचे प्रकाश आंबेडकर तसेच टी.एम.कांबळे आदींनी अनकूल प्रतिसाद दिलेला नाही. या २० पक्षांचे ऐक्य झाले, तरी निवडणुकीवर निर्णायक परिणाम होण्याची शक्यता कमी. याचे कारण आठवले यांची तळ्यातमळ्यात ही राजकीय वृत्ती व त्यामुळे गमावलेली विश्वासार्हता. रिपब्लिकन पक्षातील दुही एकाएकी संपुष्टात आली, असेही मानता येणार नाही. दुसरीकडे कृषिमंत्री शरद पवार यांच्यापुढे राज्य विधानसभेची निवडणूक व देशावर आलेले अवर्षणाचे संकट, हे दुहेरी आव्हान आहे. त्यामुळे यंदा धान्य आयातीची शक्यता टाळता येणार नाही.

देशपातळीवर डावी आघाडीही विस्कळीत आहे. तिचे नेतृत्व करणाऱ्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षापुढे पश्चिम बंगालमध्ये वाढणारा नक्षलवाद व दुसरीकडे तृणमूल कॉंग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी यांचे राजकीय आव्हान, असा पेच आहे. केरळमध्ये पक्षातील वाद विकोपाला गेलेत. विरोधक विखुरलेले असूनही सरकारच्या गेल्या शंभर दिवसांच्या कारकीर्दीत वाखाणण्यासारखे काही घडलेले नाही. रोखेबाजारतील निर्देशांकाने १५ हजारची पातळी गाठूनही प्रत्यक्षात आम आदमीच्या जीवनात फरक पडलेला नाही. जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडलेत. दिवसाकाठी वीस रूपये मिळविणाऱ्या कोट्यावधी लोकांनी खायचे काय? असा प्रश्न आहे. साखरेचे उत्पादन कमी झाल्याने सणासुदीच्या दिवसात तिचे भाव आणखी कडाडणार. अर्थमंत्री प्रणब मुकर्जी एका वार्तालापात अनौपचारिकरित्या बोलताना म्हणाले, ''शंभर दिवसांच्या योजना जाहीर करण्यात फारसा अर्थ नसतो. परंतु यावेळी मंत्रालयात स्पर्धा लागली, हे मात्र खरे. अर्थमंत्रालयाने तसे काही केले नाही. तथापि, गेल्या साठ वर्षातील अर्थव्यवस्थेचा संक्षिप्त आढावा घेता, १९५१ ते १९७१ या काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा वेग सरासरी साडे तीन टक्के होता. त्याला 'हिंदू ग्रोथ रेट' असे म्हटले जायचे. १९८० च्या दशकात हा वेग ५ टक्के, नव्वदीच्या दशकात ६ टक्के, गेल्या पाच वर्षात ८.५ टक्के झाला.

२००८ व ०९ मध्ये अमेरिकेत कोसळलेल्या अर्थव्यवस्थेचा परिणाम जगात सर्वत्र होऊन हा वेग ६.५ टक्क्यांवर



आला आहे. देशापुढे दुष्काळाचे सावट असूनही तो २००९-१० मध्ये सहा टक्क्यांपेक्षा अधिक राहील.'' ते म्हणाले, ''सर्वाधिक चिंतेची बाब म्हणजे, ६.८ टक्क्यांवर गेलेली अर्थसंकल्पातील वित्तीय व ५ टक्क्यांपेक्षा अधिक झालेली महसुली तूट होय. २०११ पर्यंत वित्तीय तुटीचे प्रमाण ५ टक्क्यांवर आणण्याचे उद्दिष्ट मी ठेवले आहे. प्रगतीचा वेग वाढवायचा असेल, तर ग्रामीण भागातून मागणीचे प्रमाण वाढले पाहिजे. त्याउद्देशाने विकासावरील खर्चाचे प्रमाण ३६ टक्क्यांनी वाढविले आहे. देशाची दोन तृतीयांश निर्यात अमेरिका, युरोपातील देश व जपान यांना होत असे. आर्थिक मंदीमुळे आपल्या निर्यातीवर विपरित परिणाम झाला. तथापि, २०१४ पर्यंत निर्यातीचे प्रमाण दुपटीने वाढवायचे, या दृष्टीने वाणिज्यमंत्री आनंद शर्मा यांनी नुकतेच जाहीर केलेले आयात निर्यात धोरण उपयोगी पडेल. पावसाने यंदा हुलकावणी दिल्याने देशातील २५२ जिल्हे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले. त्याचा परिणाम तांदुळ,ज्यूट व डाळींच्या उत्पादनावर होणार. उत्तर प्रदेश व हरियानात धान्योत्पादन कमी होईल. धान्योत्पादनात देशात एकूण २० ते २२ टक्के घट होईल. साखरेचे उत्पादन मुळीच समाधानकारक नाही. तरीही सरकारकडे गहू व तांदुळाचे साठे (बफर स्टॉक) पुरेसे असल्याने परिस्थितीवर मात करता येईल,'' असा विश्वास मुकर्जी यांनी व्यक्त केला. सरकारी क्षेत्रातील निर्गुंतवणुकीचे उद्दिष्ट साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प महामंडळ (एनएचपीसी) व ऑईल इंडिया या दोन कंपन्यांमध्ये निर्गुंतवणूक करण्याचा विचार सरकार करीत आहे.

अर्थतज्ज्ञ व जवाहरलाल नेहरू विद्यापिठातील प्रा.अमित भादुरी यांनी डी.एस.बोरकर स्मृती व्याख्यानादरम्यान येथे इशारा दिला,की आपण खाजगीकरणाकडे जितके जास्त जाऊ, तितके बेरोजगारीचे प्रमाण वाढेल. असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न बिकट होतील. तसेच आदीवासी व दलितांच्या जमिनी उद्योगासाठी घेतल्या जात असल्याने ग्रामीण भागातील असंतोष अधिक वाढेल. यातून मार्ग काढावयाचा असेल, तर ग्रामपंचायतीच्या पातळीवर वित्तीय अधिकार द्यावे लागतील. तरच संतुलित विकासाचे उद्दिष्ट गाठता येईल.

अर्थमंत्रालयाने तयार केलेल्या टिपणानुसार, खाणकाम, सामाजिक व खाजगी सेवाक्षेत्र वगळता अन्य कोणत्याही क्षेत्रात २००७-०८ ते २००८-०९ दरम्यान वृद्धी झालेली नाही. कृषि, वन, मत्सोत्पादन, वीज, नैसर्गिक वायू, पाणीपुरवठा, बांधकाम, व्यापार, हॉटेल व्यवसाय, वाहतूक, वित्तीय क्षेत्र, विमा, बससेवा, आदी क्षेत्रात या काळात सर्वत्र घट झाली.




आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने २२ एप्रिल २००९ रोजी जारी केलेल्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक आऊटलुक' या दस्तावेजानुसार, २००९ मध्ये जागतिक उत्पादन १.३ टक्के घटले. ते २०१० मध्ये अस्ते अस्ते फक्त १.९ टक्क्यावर जाईल. आशिया व पॅसिफिक क्षेत्रातील देशांविषयी तयार केलेला अहवाल नाणेनिधीने मे २००९ मध्ये जारी केला. त्यातील भारताविषयीच्या तपशीलानुसार, ''२००९-१० दरम्यान अर्थव्यवस्था सुधारण्याच्या वाटेवर असेल. जागतिक मंदीला भारताने प्रभावीरित्या तोंड दिले. भारतीय बँकांचा वित्तीय पाया भक्कम आहे. वित्तीय बाजारपेठाही सशक्त आहेत.

परकीय चलनाची गंगाजळी समाधानकारक असून परकीय कर्जाचा बोजा मर्यादित आहे,'' असे म्हटले आहे. सीमेंट, विद्युत क्षेत्र व कोळसा उत्पादनात जुलै २००९ मध्ये सुधार झाला. तथापि, जीवनावश्यक वस्तूंचे दिवसागणिक वाढणारे दर व अवर्षणाने शेतीवर झालेला परिणाम चिंताजनक असून, त्याचा विपरीत परिणाम भातशेतीखाली असलेल्या ६० लाख हेक्टर जमीनीवर होणार,'' असे म्हटले आहे. या दस्तावेजानुसार, २००९ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा वेग ४.५ टक्के तर २०१० मध्ये ५.६ टक्के असेल. रिझर्व बँकेने मात्र २००९-१० मध्ये हा वेग ६ टक्के असेल, असे भाकित केले आहे.

या परिस्थितीत 'स्वाईन फ्लू'च्या साथीने जनसामान्यात निर्माण झालेली भीती जोवर भारतातर्फे प्रभावी लस तयार केली जात नाही, तोवर कायम राहाणार. तरीही स्वच्छतेचे सामान्य नियम पाळले, गर्दीची ठिकाणे सर्वसाधारणतः टाळली, तर त्यावर मात करता येईल. या फ्लूपेक्षा मलेरिया, कुपोषण, अतिसार, मधुमेह आदी रोगांनी दगावणाऱ्यांची संख्या कितीतरी अधिक आहे, हे ही ध्यानात घ्यावे लागेल.

●●●




# जसवंतांना भोवले जीना...!

## अंतर्गत सत्तास्पर्धा व दुहीचे भाजपला ग्रहण



- डॉ. सुधीर भोंगळे

लागोपाठच्या दोन सार्वत्रिक निवडणुकांत झालेल्या लाजिरवाण्या पराभवांपासून भारतीय जनता पक्षाचे स्वतःला शहाणे समजणारे नेते काही शहाणपण शिकायला तयार नाहीत, हेच खरे! आजवर सदैव सत्तेचे नव्हे तर सेवेचे राजकारण करण्याच्या गप्पा मारणारी आणि राष्ट्रभक्ती, चारित्र्यसंपन्नता व जगातील साऱ्या नितीमत्तेचा ठेका आपल्याकडेच आहे, असा टेंभा मिरविणारी ही सारी मंडळी मुळात अत्यंत सुमार दर्जाची आणि कोत्या स्वार्थबुद्धीची आहेत, हे गेल्या काही काळातील धक्कादायक घटनाक्रमातून आता अगदी निर्विवादपणे सिद्ध झाले आहे. यावळी


सुधेंन्द्रु कुलकर्णी


अरुण शौरी

या निरर्गल सत्तालोभींच्या पक्षांतर्गत असंतोष व धुसफुशीला पुन्हा एकदा तोंड फुटले आहे ते पाकिस्तानचे जनक मरहूम महंमद अली जना यांच्यामुळेच! यापूर्वी २००५ साली बुजुर्ग नेते लालकृष्ण अडवानी यांनी जीना महोदयांचे वर्णन सच्चा राष्ट्रवादी व धर्मनिरपेक्ष नेता अशा गौरवपूर्ण शब्दांत करून सर्वांनाच चकित केले होते. त्यावेळी त्यांच्या जीनाप्रेमाला भरते आले होते. ते मुख्यतः कडवा हिंदुत्त्ववादी नेता ही आपली अडचणीची ठरू लागलेली वादग्रस्त प्रतिमा बदलण्याच्या उर्मीतून! अटलजींप्रमाणे आपल्यालाही भारतीय जनतेने उदारमतवादी, खुल्या दिलाचा नेता मानावे आणि पंतप्रधानपदाकडे जाण्याचा आपला मार्ग सुकर व्हावा, या एकमेव इच्छेने प्रेरित होऊन अडवानी ती हिशेबी चाल खेळले होते. परंतु त्यांचा तो डाव अखेर त्यांच्यावरच

**दोन सलग सार्वत्रिक निवडणुकांमध्ये झालेल्या लाजिरवाण्या पराभवांपासून काही बोध घेऊन कठोर आत्मपरीक्षण करण्याऐवजी सध्या भारतीय जनता पक्षाचे बडे-बडे नेते अंतर्गत सत्तास्पर्धेचा खेळ खेळण्यात आणि आपापसांतील दुहीचे निरर्गल प्रदर्शन घडविण्यात दंग आहेत. त्यांच्या या बेजबाबदार वर्तनाची परिणीती नुकतीच जसवंतसिंग यांच्यासारख्या बुजुर्गांच्या हकालपट्टीत झाली असून, सुधेंद्रु कुलकर्णी व अरुण शौरी यांच्यासारखे त्यांचे थिंक टँक्सच आता त्यांच्या विरोधात गेले आहेत. लागोपाठच्या दोन सार्वत्रिक निवडणुकांत झालेल्या लाजिरवाण्या पराभवांपासून भारतीय जनता पक्षाचे स्वतःला शहाणे समजणारे नेते काही शहाणपण शिकायला तयार नाहीत, हेच खरे!**

उलटला आणि मुख्यतः राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दडपणामुळे त्यांना आपले पक्षाध्यक्षपदच सोडावे लागले. अर्थात अध्यक्षपद गेले तरी लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदाची खुर्ची मात्र अडवानींनी दर प्रयत्नांनी टिकवून धरली आणि नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीतील दारुण पिछेहाटीनंतरही ती त्यांच्याकडे कायम आहे. एका अर्थाने त्यांचे हे यश म्हणजे त्यांच्या सरड्याप्रमाणे रंग बदलणाऱ्या निगरगट्ट राजनितीचा आणि त्यांनी स्वतःभोवती गोळा केलेल्या लाळघोट्या खुशमस्कऱ्यांचा तात्पुरता विजय आहे. त्यामुळे ना त्यांची प्रतिमा उंचावलीय ना त्यांच्या पक्षाचा काही फायदा झालाय! खरे तर, केंद्रात सत्तापदी येण्याचे स्वप्न पुन्हा एकवार भंगल्यावर भाजपचे नेतृत्व काही आत्मपरीक्षण करेल आणि सध्याच्या अपयशास जबाबदार असलेल्या सर्वांना 'निरोपाचा नारळ' देऊन नव्या जिद्दीने कामास लागेल अशी सर्वसाधारण अपेक्षा होती. परंतु चोर सोडून संन्याशालाच बळी देणे सोयीचे वाटल्यामुळे की काय, गेल्या तीन महिन्यात अडवानी आणि कंपूने स्वतःला वगळून बाकी सर्वांना या-ना-त्या शिस्तभंग कारवाईची शिकार केले आहे. त्यांच्या या शिकारीच्या खेळात यावेळी बळी गेला आहे तो चक्क पक्षाचे संस्थापक सदस्य जसवंतसिंग यांचा. आजवर अटलजी-अडवानींच्या रांगेत मानाने बसणाऱ्या या अनुभवसंपन्न ज्येष्ठ नेत्याला नुकतेच आपले पक्षसदस्यत्व गमवावे लागले आहे ते मरहूम जीनांची आरती ओवाळण्याचे बद्कर्म (?) केल्यामुळे! जसवंतसिंग हे इतरांप्रमाणे केवळ पोटभरू राजकारणी नाहीत तर माजी लष्करी अधिकारी आणि उत्तम लेखकही आहेत. त्यांचे 'जीना, इंडिया, पार्टिशन इन्डिपेंडन्स' हे भारतीय स्वातंत्र्यांच्या इतिहासाचा अभ्यासपूर्ण मागोवा घेणारे नवे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले असून, त्यात त्यांनी जीनांचा उल्लेख महान राष्ट्रवादी नेता म्हणून केला आहे, अर्थात तो सप्रमाण करीत असताना त्यांनी देशाच्या दुर्दैवी फाळणीचे खापर मात्र पंडित नेहरू आणि सरदार पटेल यांच्या डोक्यावर फोडण्याचे अनावश्यक दुःसाहसही केले. ते करण्याचा त्यांचा नेमका हेतू कदाचित ते म्हणतात त्याप्रमाणे इतिहासाच्या वस्तुनिष्ठ परिक्षणाचा असूही शकतो. परंतु त्यामुळे 'हिंदू



*राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहनराव भागवत यांनी लालकृष्ण अडवानी यांना भाजपाचे अध्यक्षपद सोडण्याचाच अप्रत्यक्षपणे इशारा दिला आहे.*

राष्ट्रवादा'ची पताका खांद्यावर घेऊन वावरणाऱ्या भाजप व संघजनांचे पित्त मात्र निश्चितच खवळले आणि मग निवडणुकीतील पराभवाचे विश्लेषण करण्यासाठी सिमल्यात झालेल्या त्यांच्या 'चिंतन बैठकीचा साफ बोजवारा उडाला. विशेष म्हणजे या बैठकीसाठी अन्य सर्व भाजप नेत्यांप्रमाणे जसवंतसिंगही सिमला येथे दाखल झाले होते. परंतु दरम्यान त्यांच्या पुस्तकातील वादग्रस्त मजकुराचा अंदाज आल्यामुळे अडवानी-राजनाथसिंह कंपूने त्यांना बैठकीस न येण्याचा निरोप दूरध्वनीवरूनच दिला आणि मग त्यांची बाजू ऐकून घेण्याचे साधे सौजन्यही न दाखविता त्यांना पक्षातूनही काढून टाकले. तीस वर्षांहून अधिक काळ आपल्या समवेत वावरलेल्या आणि पक्षाच्या जडणघडणीत महत्त्वाचे योगदान असलेल्या एका ज्येष्ठ सहकाऱ्यास अशी अपमानास्पद व निंद्य वागणूक देऊन अडवानी व त्यांच्या कंपूने निवडणुकीतील पराभवाची कारणमीमांसा करणे मोठ्या शिताफीने टाळले असले तरी त्यांचा सुसंस्कृतता व सभ्यतेचा मुखवटा मात्र साफ टरकावला गेला आहे. आजवर ही मंडळी लोकशाही विचारस्वातंत्र्य आणि इतरांच्या मतांचा आदर आदि आदर्श तत्त्वांचा उठता-बसता उच्चार करीत होती आणि या तत्त्वांची पायमल्ली केल्याबद्दल इंदिराजींसारख्या उत्तुंग व्यक्तीमत्त्वांना 'हुकुमशहा' म्हणून दूषणे देत होती. परंतु आता 'जसवंतसिंग प्रकरणां'मुळे त्यांचे स्वतःचेच मातीचे पाय अगदी लखलखीतपणे उजेडात आले आहेत. त्याची शिसारी आल्यामुळेच की काय, भाजपचे थिंक टँक म्हणून ओळखले जाणारे सुधेंद्रु कुलकर्णी यांनीही आता त्या पक्षाबरोबरचे संबंध तोडले असून, ज्येष्ठ पत्रकार अरुण शौरी व माजी सनदी अधिकारी यशवंत सिन्हा यांच्यासारखे अन्य बंडखोर नेतेसुद्धा त्याच मार्गावर आहेत. अर्थात त्यांना बंडखोर ठरविणे आणि पक्षाबाहेरचा रस्ता दाखविणे भाजपच्या अवनती व अधःपातास खऱ्या अर्थाने जबाबदार असलेल्या अडवानी कंपूच्या दृष्टीने सोयीस्कर असले तरी भाजपच्या मात्र मुळावर येणारे आहे, यात तीळमात्र संशय नाही. आज राष्ट्रीय राजकारणात स्वार्थी सत्तालोलुप नेते आणि त्यांच्या संधीसाधू-फुटकळ पक्षांचा बुजबुजाट झालेला आहे. त्यांचा अधिक प्रादुर्भाव रोखून राजकारणाचे क्षेत्र विधायक व जनकल्याणकारी बनवायचे तर काँग्रेसप्रमाणे भाजपचेही अस्तित्व टिकून राहाणे गरजेचे आहे. ते टिकविण्याच्या दृष्टीने सोनियाजी व डॉ. मनमोहनसिंग यांच्या समर्थ नेतृत्वाखाली काँग्रेस चांगले यश मिळवित असताना लुंग्या-सुंग्या उपटसुंभ नेत्यांच्या नादी लागून भाजप मात्र स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेत आहे असे दिसते.

अर्थात त्या पक्षाने व त्यांच्या मातृसंस्थेने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने काय करावे हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. परंतु या मंडळींच्या बेजबाबदार उद्धटपणामुळे एकूण देशाचे राजकारण अधिक सुसंस्कृत, प्रगल्भ व उदारमतवादी बनण्यास अटकाव होत आहे, हे मात्र दुर्लक्षून चालणार नाही. म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतो त्याचे जरुर दुःख होते, असे जे म्हणतात तसेच काहीसे या 'जसवंतसिंग प्रकरणांत' घडताना दिसत आहे. खरे तर, कोणी एखाद्या जसवंतसिंगांनी प्रशंसा केली म्हणून आता महंमद अली जीनांचे महत्त्व वाढणार नाही वा देशाच्या फाळणीचे गुन्हेगार ही त्यांची पूर्वापार ओळखही पुसली जाणार नाही. तीच गोष्ट भारताचे थोर स्वातंत्र्यसेनानी पं. नेहरू व सरदार पटेल यांची आहे. जसवंतसिंग यांनी 'फाळणीचे खरे सुत्रधार' असल्याचा ठपका या नेत्यांद्वारे ठेवलेला असला तरी भारतीय जनतेच्या मनात त्यांच्याविषयी असलेला आत्यंतिक आदर कमी होण्याची सुतराम शक्यता नाही. त्यामुळे एका वेगळ्या व वैयक्तिक दृष्टिकोनातून केली गेलेली इतिहासाची अभ्यासपूर्ण मांडणी, म्हणूनच जसवंतसिंग यांच्या नव्या पुस्तकाकडे पाहिले जाणे जरुरीचे आहे. पण प्रारंभी म्हटल्याप्रमाणे ते शहाणपण सध्याच्या भाजप नेत्यांकडे नसल्यामुळेच तर सध्याचे वादळ निर्माण झाले आहे. त्यात सध्या तरी फक्त जसवंतसिंग यांची दांडी उडाल्याचे दिसत असले तरी अखेर हे वादळ शांत होईल ते अंतर्गत फाटाफूट व वैचारिक दुहीने ग्रासलेल्या भाजपची साफ वाताहत घडवूनच, याबद्दल आमच्या मनात तरी अजिबात संदेह नाही, पाहू या काय होते ते!



## राजेंचे राजनाथना आव्हान

यावेळी राजस्थानात लोकसभेप्रमाणे विधानसभेच्या निवडणुकीत भाजपची मोठी पिछेहाट झाली. त्याची जबाबदारी स्विकारून माजी मुख्यमंत्री वसुंधराराजे यांनी सध्याच्या विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा द्यावा, म्हणून पक्षश्रेष्ठी गेले तीन महिने



प्रयत्न करीत आहेत. परंतु नवनिर्वाचित आमदारांचा पाठिंबा आपल्यालाच आहे, असे सांगून वसुंधराराजेंनी त्यांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत. मध्यंतरी आपल्या समर्थक आमदारांच्या जथ्यास थेट दिल्लीस पाठवून त्यांनी तेथेही आपले शक्तीप्रदर्शन केले. आता पक्षाध्यक्ष राजनाथसिंहांनी हा 'पोरखेळ' थांबविण्याचा इशारा वसुंधराराजेंना दिला आहे. पण 'सार्वत्रिक निवडणुकीतील पराभवाची जबाबदारी अन्य वरिष्ठ नेते घेत नसताना आपला राजीनामा कसा काय मागितला जातो, असा प्रश्न विचारून त्यांनी सर्वांनाच निरुत्तर केले आहे.

## सारी धडपड खरा इतिहास लपविण्याची!

ऐतिहासिक सत्य संशोधनास आणि जीनांच्या उदात्तीकरणास भाजप व रा. स्व. संघाचा विरोध आहे. कारण 'खरा' इतिहास उजेडात आला तर आपल्या फुटपाड्या हिंदुत्त्ववादी राजकारणासच छेद जाईल, अशी भिती त्यांना वाटते. आत्तापर्यंत या संधीसाधू, हिंदुत्त्ववादी राजकारणाच्या आश्रयाने आपली प्रगती करून घेतांना भाजपच्या अडवानी आदि धुरीणांनी गोविंदाचार्यांपासून मदनलाल खुराणांपर्यंत आणि उमा भारतींपासून शंकरसिंह वाघेलापर्यंत अनेक भल्या-भल्या सहकाऱ्यांचे पत्ते कापलेले आहेत. आता जीनांच्या प्रशस्तीचे आणि वल्लभभाईंच्या तथाकथित बदनामीचे निमित्त पुढे करून त्यांनी जसवंतसिंग यांच्यासारख्या बुजुर्गाला अवमानित केले आहे. परंतु बहुमताच्या जोरावर होत असलेली ही दंडेलशाही म्हणजे अन्य काही नाही तर काचेच्या घरात राहाणाऱ्यांनी इतरांवर दगडफेक करण्यासारखा आत्मघातकी प्रकार आहे.

## बीजेपी म्हणजे 'भयग्रस्त जनता पक्ष!'

बीजेपी म्हणजे भारतीय जनता पक्ष नव्हे तर भ्रष्टाचारी जनता पक्ष, अशी मार्मिक टिप्पणी मध्यंतरी काँग्रेसचे प्रवक्ते अभिषेक सिघंवी यांनी केली होती, आता जसवंतसिंग यांनी यापुढे जाऊन हा भयग्रस्त जनता पक्ष बनला असल्याचे बोलून दाखविले आहे तर गोविंदाचार्य यांनी त्याचे वर्णन भरकटलेला जनता पक्ष अशा शेलक्या शब्दात केले आहे. या सर्व कोपरखळ्या भाजपमध्ये माजलेली अंदाधुंदी व गोंधळ यावर प्रकाश टाकतातच परंतु या पक्षाचे भवितव्य फारसे आशादायी नाही हेही स्पष्टपणे सूचित करतात. जसवंतसिंग यांनी आपल्या एका ताज्या मुलाखतीत जे विचार व्यक्त केले आहेत ते खूप काही सांगून जाणारे आहेत. ते



म्हणतात की, अटलजींच्या कारकिर्दीत परमसहिष्णुता व परस्परविश्वासाचे असे काही सुंदर वातावरण होते की भाजपच्या नेते-कार्यकर्त्यांत तर बहुतेक सर्व मुद्द्यांवर एकवाक्यता होतीच पण त्यास देशभरातील विभिन्न विचारप्रणालीच्या तब्बल २५ छोट्या-मोठ्या पक्षांची साथही लाभली होती. अटलजींच्या निवृत्तीनंतर मात्र हे सारे चित्र पाहाता-पाहाता बदलले आणि आज काही तुरळक अपवाद वगळता राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील बहुतेक सर्व पक्षांनी भाजपकडे पाठ फिरवली आहे. जसवंतसिंग यांची ही मुलाखत प्रसिद्ध होत असताना हरियानात ओमप्रकाश चौताला यांच्या राष्ट्रीय लोकदलाबरोबर असलेली भाजपची मैत्री संपुष्टात यावी, हा योगायोग राजकीय वाऱ्यांची बदलती दिशाच सुचित करणारा आहे.

●●●



# बीओटीतून २१ हजार कोटींची बांधकामे

**– छगन भुजबळ**



''पायाभूत सुविधांच्या विकासाच्या बाबतीतही आपण केलेली कामगिरी नेत्रदीपक आहे. उदाहरणच घ्यायचं झालं तर नुकत्याच उद्‌घाटन करण्यात वांद्रे–वरळी सागरी सेतूचं घेता येईल. जगात अशा 'केबल स्टेड' प्रकारचे अगदी मोजके सहा–सातच पूल आहेत. आपल्या कोलकत्याला हावडा ब्रिज आहे, पण तो नदीवर आहे. प्रचंड क्षमतेच्या लोखंडी दोरखंडांनी तोलून धरलेल्या या सागरी सेतूखालून अगदी आरामात जलवाहतूक होऊ शकते. या पुलाचं काम सुरू असताना मुंबईच्या, सागराच्या सौंदर्याला बाधा येईल, असेही आक्षेप घेतले गेले. पण आज या सेतूच्या रूपानं मुंबईच्या सौंदर्यस्थळांत भरच पडली आहे. गेट वे ऑफ इंडिया, नरिमन पॉइंट, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस यांच्या बरोबरीनं मुंबईची नवी ओळख ठरलेली हा सागरी सेतू पहायला पर्यटक येऊ लागले तर आश्चर्य वाटायला नको.

''काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यापासून गेल्या ५ वर्षांत २१ हजार कोटींची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने बीओटी (बांधा-वापरा-हस्तांतरीत करा) तत्त्वावर हाती घेतली असून ती लवकरच पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर बांधकामे प्रथमच झालेली असून त्या बांधकामांचा दर्जाही उत्तम प्रतीचा राखण्यात आम्हाला यश प्राप्त झाले आहे. तसेच नवीन प्रकारची अत्याधुनिक डिझाईन्स तयार केल्यामुळे ही बांधकामे अत्यंत आकर्षक स्वरूपाची झालेली आहेत'' असे राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री व उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले.

मुंबईच्या फोर्ट भागातील मर्झबान आवारामध्ये जुनी इमारत पाडून नव्याने बांधण्यात आलेल्या बांधकाम भवनाचे उद्‌घाटन २४ ऑगस्ट २००९ रोजी राज्याचे मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांच्या हस्ते झाले. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात अध्यक्षपदावरून श्री. भुजबळ बोलत होते. समारंभाला श्रममंत्री व मुंबईचे पालकमंत्री नबाब मलिक, आमदार श्रीमती ॲनी शेखर, आमदार भाई जगताप, बांधकाम विभागाचे सचिव धनंजय धवड, सचिव गं. म. कंधारे आणि मुख्य अभियंता स. भ. तामसेकर उपस्थित होते.

श्री. छगन भुजबळ पुढे म्हणाले, ''राज्यात व मुंबई शहरात आपल्याकडे भरपूर जागा आहेत पण बांधकाम विभागाला स्वतःचे असे एकही भवन नव्हते. हे भवन उभे करावे अशी अनेकांची खूप वर्षांपासूनची इच्छा होती. तसे सर्वांनी अनेकदा बैठकीत सुचविलेही होते. परंतु या भवनासाठी सरकारकडून पैसे मिळणे शक्य नव्हते. म्हणून अंधेरीच्या बीओटी प्रकल्पांबरोबर सांगड घालून हे बांधकाम भवन उभे करण्यात आले आहे. १ लाख ११ हजार चौ. फुट जागा असलेल्या या बांधकाम भवनाची आजच्या बाजारभावाने किंमत ६०० कोटी रुपये आहे. नव्याने बांधकाम विभागाची काही कार्यालये या भवनात हस्तांतरीत करण्यात आली असून आणखीन काही कार्यालये नव्याने सुरू केली जाणार आहेत. या भवनाचा पुढचा भाग हा हेरिटेज प्रकारातील असल्यामुळे त्याला पाडायचे नाही असे पुरातत्व विभागाने आम्हाला सुचविले होते त्यामुळे २७०० चौ. फुटांचे बांधकाम अजिबात पाडण्यात आलेले नाही. जुन्या बांधकामाला तसेच ठेवून त्याला साजेशी होईल अशा पद्धतीने तळमजला अधिक वरती सात मजले अशी आठ मजली इमारत उभी करण्यात आलेली आहे. या भवनामध्ये ३०० लोक बसू शकतील असे अद्ययावत सभागृह बांधण्यात आलेले असून सुसज्ज ग्रंथालयही निर्माण करण्यात आलेले आहे. या ग्रंथालयात बांधकाम साहित्याचे वेगवेगळे नमुने असलेली तसेच जुनी कागदपत्रे जतन करण्यात येणार आहेत.

अंधेरीला ५० हजार चौ. फुटांची प्रशासकीय इमारत तयार होत असून तिथे आणखीन २६ हजार फुटांची घरे कर्मचाऱ्यांसाठी बांधली जात आहेत. तसेच कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या ट्रेनिंग सेंटरचेही काम पूर्ण होते आलेले आहे. दिल्लीत आपण नव्याने बांधित असलेले महाराष्ट्र सदन हे देशातील सर्वोत्कृष्ट भवन ठरणार असून सेवन स्टार दर्जा





त्याला प्राप्त होऊ शकेल. येत्या ७-८ महिन्यात दिल्लीतील भवनाचे कामही पूर्ण होईल असा अंदाज असून अंधेरीला आरटीओ बिल्डिंग, चेंबूरला आंबेडकर भवन व वेगवेगळ्या इमारती वेगाने उभ्या राहत आहेत. बीओटी तत्त्वाशी सांगड घालून जवळपास ७ ते १० हजार कोटींच्या इमारती आणि ११ हजार कोटींचे रस्ते अशी एकूण २१ हजार कोटींची बांधकामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सध्या केली जात आहेत. नवनवीन प्रकारच्या युक्त्या योजून व एकत्र बसून बांधकामाचे प्रस्ताव आणि आराखडे तयार केले जात आहेत. गेल्या ५ वर्षात या खात्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जे सहकार्य केले त्यामुळे वेगाने ही सर्व कामे आम्ही पूर्ण करू शकलो आहोत असेही श्री. भुजबळ यांनी सांगितले.

गेल्या ५ वर्षात राज्य सरकारच्या बांधकाम विभागानं केलेल्या कामगिरीसंबंधीचा आढावा घेताना श्री. भुजबळ म्हणाले की, ''पायाभूत सुविधांच्या विकासाच्या बाबतीतही आपण केलेली कामगिरी नेत्रदीपक आहे. उदाहरणच घ्यायचं झालं तर नुकत्याच उद्‌घाटन करण्यात वांद्रे-वरळी सागरी सेतूचं घेता येईल. जगात अशा 'केबल स्टेड' प्रकारचे अगदी मोजके सहा-सातच पूल आहेत. आपल्या कोलकत्याला हावडा ब्रिज आहे, पण तो नदीवर आहे. प्रचंड क्षमतेच्या लोखंडी दोरखंडांनी तोलून धरलेल्या या सागरी सेतूखालून अगदी आरामात जलवाहतूक होऊ शकते. या पुलाचं काम सुरू असताना मुंबईच्या, सागराच्या सौंदर्याला बाधा येईल, असेही आक्षेप घेतले गेले. पण आज या सेतूच्या रूपानं मुंबईच्या सौंदर्यस्थळांत भरच पडली आहे. गेट वे ऑफ इंडिया, नरिमन पॉइंट, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस यांच्या बरोबरीनं मुंबईची नवी ओळख ठरलेली हा सागरी सेतू पहायला पर्यटक येऊ लागले तर आश्चर्य वाटायला नको.

रस्त्यांच्या चौपदरीकरणाच्या बाबतीतही आपण घेतलेली आघाडी लक्षणीय आहे. आज राज्यात सुमारे १८ हजार कोटी रूपयांची रस्त्यांच्या चौपदरीकरणाची कामं मार्गी लागली आहेत. बरीचशी पूर्ण झाली आहेत. काही पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. यामध्ये केंद्र सरकारचं सहकार्य मोठं आहे. या कामांमध्ये जवळजवळ ५० टक्के निधी केंद्राचा आहे. त्याचबरोबर राज्य शासनाच्या काही प्रकल्पांमध्येही केंद्राचा २० टक्के सहभाग आहेच. केंद्रानं संपूर्ण देशात जेवढा निधी दिला त्याच्या जवळजवळ निम्मा महाराष्ट्राला दिला, एवढी एक वस्तुस्थिती लक्षात घेतली



तरी राज्यात होणाऱ्या विकासकामांचा अंदाज येऊ शकेल. मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवे पूर्ण झालेलाच आहे. याशिवाय, मुंबई-नाशिक-धुळे, पुणे-सोलापूर या रस्त्यांचं काम सुरू आहे. पुणे-नगर-औरंगाबाद मार्गाचं काम जवळजवळ पूर्ण झालेलं आहे. नाशिक-औरंगाबाद-जालना-बीड, औरंगाबाद-पैठण, नागपूर-अमरावती अशी राज्यातली सगळी मोठी शहरं मोठ्या चौपदरी रस्त्यानं जोडली जाताहेत. विशेषतः मुंबई-पुणे-औरंगाबाद-नाशिक हा सुवर्णचतुष्कोन विकसित करण्यावरही आपण भर दिला आहे. भविष्यात याचा लाभ राज्याच्या औद्योगिक वृद्धीसाठीच होणार आहे. राज्यात येणारे उद्योग हे मुंबई-पुण्यापुरतेच मर्यादित न राहता या चौपदरी मार्गावरून राज्याच्या अन्य कोणत्याही भागात अगदी सहजतेने जाऊ शकणार आहेत. दळवणवळणाच्या साधनांच्या सहज उपलब्धतेमुळं या रस्त्यांवरून विकास आपल्या दारी धावत येणार आहे.

आणखी एक गोष्ट मला आवर्जून नमूद कराविशी वाटते, ती म्हणजे वनखात्याच्या अख्यत्यारितील एक-दोन टक्का सोडली तर राज्यातली जवळजवळ ९९ टक्के गावं आपण रस्त्यांनी जोडलेली आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाचा मंत्री या नात्याने काम करत असताना राज्यात मूलभूत सोयी-सुविधा अर्थात, रस्ते, पुल, सार्वजनिक इमारती व इतर सुविधा यांची निर्मिती करण्यात फार मोठं योगदान या खात्यानं दिलं आहे, हे मला अभिमानानं नमूद करावंसं वाटतं. या विभागाच्या कामगिरीचा आढावा आकडेवारीच्या अंगानं घ्यायचा झाल्यास सुमारे तीन लाख चौरस किलोमिटर क्षेत्रफळ असलेल्या महाराष्ट्रातील रस्त्यांची लांबी आजमितीस दोन लाख, ३५ हजार किलोमीटरपेक्षा जास्त आहे. या राज्यातील ४० हजार ४१२ गावांपैकी जवळजवळ ४० हजार गावं रस्त्यांनी जोडली आहेत.

राज्य शासनानं महाराष्ट्रात खाजगी-सार्वजनिक सहभागातून अर्थात बीओटी तत्त्वावर अनेक कामं हाती घेतली आहेत. त्यामुळं खाजगीकरणांतर्गत राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत आत्तापर्यंत २६३० किलोमीटर लांबी भरेल एवढे रस्त्यांच्या दुपदरी तसेच चौपदरीकरणाचे प्रकल्प हाती घेण्यात आले असून त्यावर १८ हजार ४८८ कोटी रुपये खर्च होणार आहेत.

मला या ठिकाणी सांगायला आनंद वाटतो की, केंद्रीय मार्ग निधी योजना राबविण्यात महाराष्ट्राचा देशात पहिला क्रमांक आहे. आतापर्यंत १४६३ कोटी रुपये खर्चांची कामे मंजूर झाली असून पैकी ९२३ कोटी रूपये खर्च झाले आहेत. या खर्चामधून सुमारे ४००० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची सुधारणा करण्यात आली, ३८८ पूल बांधून पूर्ण झाले आहेत.

●●●








# ग्रामस्वच्छतेचे काटेवाडी प्रारूप

शब्दांकन :
डॉ. सुधीर भोंगळे

बारामतीपासून १० कि.मी. वर असणारे काटेवाडी हे गाव म्हणजे मूळची कण्हेरी खालची वाडी. २००१ च्या जनगणनेनुसार गावाची लोकसंख्या ६१४४ आहे आणि आत्ता अंदाजे ८५०० च्या आसपास आहे. बारामती तालुका हा तसा मूळचा दुष्काळी, अवर्षण प्रवण भाग. ३०० ते ४०० मि.मि. पावसाचा प्रदेश. या दुष्काळी भागातील शेतीला पाणी पुरविता यावे म्हणून ब्रिटिशांनी १८७५ मध्ये भाटघर धरण बांधले. त्यावेळेला दुष्काळी काम म्हणून धरणे, कालवे बांधणे यांची कामे काढली जायची. १८८० च्या सुमाराला असाच मोठा दुष्काळ पडलेला असताना लोकांना हाताला काम द्यायला पाहिजे या भावनेने ब्रिटिशांनी या काटेवाडीच्या परिसरात कालव्याचे काम चालू केले. काम पूर्ण झाल्यानंतर आजूबाजूच्या शेतीला पाणी मिळू लागले. त्यामुळे मूळची कण्हेरी गावात राहणारी अनेक कुटुंबे शेतीवर जाऊन राहू लागली आणि त्यातून काटेवाडी तयार झाली. हळूहळू वाडीची लोकसंख्या मूळ गावापेक्षा जास्त झाली म्हणून १ सप्टेंबर, १९८३ रोजी कण्हेरीपासून ही वाडी वेगळी करून स्वतंत्र ग्रामपंचायत बनविण्यात आली. आज ८४८ कुटुंबे या गावात राहताहेत. सगळे गाव बागायत आहे. गेली १००-१२५ वर्षे शेतीला सिंचन होत असल्यामुळे लोकांची आर्थिक परिस्थिती दुष्काळी भागातील लोकांच्या तुलनेत खूपच चांगली आहे. त्यात श्री. शरद पवार आणि श्री. अजित पवार यांच्यासारखी नेते मंडळी या गावातली असल्यामुळे शासकीय योजनांची मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी येथे झाली तर नवल वाटायला नको. अर्थात सत्ता आली म्हणजे सगळा विकास आपोआप होतो हे खरे नाही. स्थानिक जनतेलाही विकासाची तितकीच आस व तळमळ मुळातून असणे आवश्यक असते. नुसते नेतृत्व विकासाभिमुख असून जमत नाही. गावाचीही एकजूट व एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून व संघटित-सामुदायिक कामाचे सामर्थ्य ओळखून ते पूर्णत्वाला नेण्याच्या दिशेने खपण्याची मानसिकता असावी लागते. अशी विजीगिषा संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या रूपाने काटेवाडीत वाढीला लागली आणि गेल्या आठ-नऊ वर्षांत गावाचा पूर्ण चेहरामोहरा बदलून गेला. हे सगळं कसं घडलं त्याची अनिल काटे, एकनाथ काटे, राजेंद्र तुकाराम पवार, सरपंच सौ. मिनाक्षी दादासो देवकाते यांनी सांगितलेली ही हकीकत.

२००४ साली सौ. सुनेत्रा अजित पवार यांनी पहिल्यांदा काटेवाडी गाव पूणपणे हगणदारीमुक्त करायचे आणि गावात शंभर टक्के संडास बांधायचे म्हणून गावकऱ्यांची बैठक बोलाविली. सौ. नंदाताई अनिल काटे ही महिला त्यावेळी सरपंच होती. गावातले ८० टक्के लोक त्यावेळी उघड्यावर संडासला जात होते. मोठमोठे बंगले असणारे, चार व दुचाकी गाड्या असणारे लोकही घरात संडास बांधायचा विचार करीत नव्हते. निर्मलग्राम अभियानात भाग घेण्याचा गावाने घेतलेला निर्णय आणि सुनेत्रा वहिनींचा संडास बांधण्यासाठीचा आग्रह, रेटा व त्यासाठी लागेल ते सहकार्य करण्याची वृत्ती यामुळे निरनिराळे मार्ग, युक्त्या योजून व अडचणींवर मात करून आता गाव शंभर टक्के हगणदारीमुक्त करण्यात आले आहे. सुरूवातीला गावातील शेतमजुरांचा पैशाचा प्रश्न होता. गावकऱ्यांनी एकत्र येऊन शौचालये वाटून घेतली. १५०० रू. प्रती संडास अशी वर्गणी काढली आणि १५०० रू. पतसंस्थेकडून कर्ज

**बारामती तालुक्यातील काटेवाडी या गावाला महाराष्ट्र शासनाचा संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातला २००६-०७ या वर्षीचा राज्यातला पहिला २५ लाखांचा पुरस्कार मिळाला आहे. योगायोगाने हे गाव देशाचे कृषिमंत्री शरद पवार आणि राज्याचे जलसंपदा, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री अजित पवार यांचे आहे. त्यामुळे कदाचित हे पारितोषिक काटेवाडीला वशिल्याने, नियम डावलून दिले की काय अशी शंका अनेकांच्या मनांत डोकावण्याची भिती आहे. पण गावाने प्रचंड लोकसहभाग व एकजूट दाखवून आणि गेली ९ वर्षे सातत्याने खपून जे काम केले आहे ते पाहिल्यावर पुरस्काराच्या योग्यतेची साक्ष व खात्री पटते. आता हे गाव ग्रामस्वच्छतेचे नवे 'प्रारूप' (मॉडेल) म्हणून पुढे आले आहे. आपण सर्वांनी जाऊन ते समक्ष पाहायला हवे.**



देऊन तीन हजारात संडास बांधले. पणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ४७५० रूपये प्रती शौचालयासाठी कर्ज मंजूर केले. जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या १३२ लोकांना सहा हजाराप्रमाणे अनुदान देऊन त्यांचीही शौचालये बांधण्यात आली. ज्यांना जागेची अडचण होती त्यांच्यासाठी दोन-तीन घरांत मिळून एक शौचालय अशी २२ शौचालये दीपनगर वसाहतीत बांधण्यात आली. काही लोकांच्या स्वयंपाक घराशेजारीच संडास बांधले आणि शौच खड्ड्यावर चुली केल्या. त्यामुळे मैल्याची विल्हेवाट लागून इंधनाचा प्रश्नही संपुष्टात आला. सर्व शौचालयांना 'आरोग्य मंदीर' असे नाव देण्यात आले असून तिथूनच आरोग्याच्या स्वच्छतेची सुरूवात होते. मंदीर म्हटले की स्वच्छता हा विचार मनात येतो. सहसा शौचालये व्यवस्थित धुतली जात नाहीत. स्वच्छता नीट ठेवली जात नाही. पाण्याचा कमी वापर केला जातो. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन पाण्याचा कमी वापर होईल अशीच भांडी बसविण्यात आली आहेत. सुरूवातीला निर्मलग्राम योजनेत गाव अयशस्वी झाले. लोकसंख्या मोठी होती. उभारी येण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागले. लोकसंख्या हाच एकमेव निकष होता. तो बदलावा यासाठी आम्ही केंद्रिय ग्रामीण विकास राज्यमंत्री सूर्यकांता पाटील यांच्याकडे गेलो. तसा अर्ज दिला पण उपयोग झाला नाही. मग पुन्हा लोकांची मानसिकता बदलण्याचा कार्यक्रम जोरदारपणे हाती घेऊन दुसऱ्या वर्षी पुरस्कारासाठी पुन्हा प्रस्ताव सादर केला. आणि मे २००७ मध्ये गाव पूर्णपणे हगणदारीमुक्त होऊन राष्टपतींच्या हस्ते गावाला निर्मलग्राम स्वच्छतेचा पुरस्कार मिळाला.

घरातील घन कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी व कचऱ्याचे निर्मूलन करण्यासाठी प्रत्येकाच्या घरासमोर नाडेफचे खड्डे बांधून दिले. तसेच १०० बॅरल आणून त्यापासून २०० कचराकुंड्या तयार केल्या. ग्रामपंचायत सुरूवातीला आठ-पंधरा दिवसातून एकदा ट्रॅक्टरमधून कचरा गोळा करत असे. आता ग्रामपंचायतीने घंटागाडी घेतली असून तिच्यामार्फत रोज कचरा गोळा केला जातो. गावाबाहेर कचरा डेपो काढण्यात आला असून तेथे खतावर प्रक्रिया केली जाते. लोकांना ग्रामपंचायतीने सुरूवातीला घरोघरी प्रत्येकी दोन बकेट दिल्या जेणेकरून त्यांना ओला व सुका कचरा वेगवेगळा करता यावा. गेल्या तीन वर्षांपासून लोक आता कचऱ्याची विभागणी करून त्याची स्वतंत्रपणे विल्हेवाट लावतात.

पूर्वी गावातील सगळी गटारे उघडी होती. रस्त्याच्या मधूनच घाण पाणी वाहायचे. त्यामुळे गावात घाण पाण्याची डबकी तयार व्हायची. आता ७५ टक्के गटारे भूमिगत पद्धतीने बांधण्यात आली असून गावाबाहेर बांधलेल्या नाल्यावरील गॅबियन बंधाऱ्यात हे गटाराचे पाणी नेऊन सोडले जात आहे. आणि तेथून हे पाणी शेतीला नेले जात आहे. काटेवाडी हे देशातील पहिले 'इको व्हिलेज' (पर्यावरणदृष्ट्या समृद्ध) बनविण्यासाठी त्याला अनुषंगिक अशी

वेगवेगळी कामे हाती घेण्यात आली असून त्यासाठी २७ कोटी रूपयांचा प्रकल्प बनविण्यात आला आहे. व ही रक्कम केंद्र सरकारतर्फे उपलब्ध करून दिली जाणार आहे. सांडपाणी व्यवस्थापनाचे काम लवकरच हाती घेण्यात येऊन त्यावर प्रक्रिया करून ते शुद्ध करण्याची योजनाही राबविली जाणार आहे. सांडपाणी शेतीला वापरत असल्यामुळे खताची मात्रा कमी लागते आहे. गावात साडेसहा कि.मी. लांबीचे रस्ते बनविण्यात आले असून त्यातील निम्मे रस्ते काँक्रीटचे तर निम्मे डांबरीकरण केलेले आहेत. सपाटीच्या रस्त्याला डांबरीकरणाचे तर उतार व खडकावरचे रस्ते काँक्रीटचे बनविण्याची योजना आखून त्यासाठी जिल्हा परिषदेच्या १२ व्या वित्त आयोगातून रक्कम खर्ची करण्यात आली आहे. भुयारी गटारांची एकूण लांबी ३२०० मिटर आहे.

ग्रामस्वच्छता अभियान राबवायला सुरूवात केल्याबरोबर सर्वप्रथम वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. पहिल्याच वर्षी २५०० झाडे लावण्यात आली. प्रामुख्याने कदंब, सप्तपर्णी, गुलमोहर, शंखेश्वर अशी वेगवेगळ्या प्रकारची झाडे उपलब्ध जागा आणि माती व पाण्याची उपलब्धता पाहून त्याप्रमाणे लावली. लावलेली सगळी झाडे कशी जगतील हे बारकाईने पाहिले. प्रसंगी टँकरनेही झाडांना पाणी घालून ती जगविली. ज्या लोकांच्या घरासमोर झाडे लावण्यात आली होती त्यांना ती जगविण्याची जबाबदारी दिली. खडकाच्या ठिकाणी ब्लास्टिंग करून झाडे लावली आणि झाडांना ठिबक संचाद्वारे पाणी देण्याची व्यवस्था केली. त्यामुळे आज सगळे गाव हिरवेगार बनले असून काटेवाडीच्या कमानीत शिरल्यापासून आपल्याला रस्त्याच्या दुतर्फा हिरवीगार झाडे दिसतात.

गावाला पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी दोन विहिरींचा वापर करण्यात येत असून त्यातील पाणी एकत्र करून टाकीत आणले जाते. १ लाख लिटर क्षमतेची ही टाकी असून आता जवळपास सात कोटी रुपये खर्च करून मोठी पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र



**काटेवाडीतील विकास कामांची झलक**







# सुनेत्राच्या यशाची १० सूत्रे

खेडेगावात राहून त्या गावच्या विकासाचे काम करणे ही वाटते तेवढी सोपी गोष्ट नाही. शहरातल्या माणसांनी बाहेरून जाऊन तिथे काम करणे ही तर खूप अशक्यप्राय आणि त्रासदायक गोष्ट. यापूर्वीही अनेकांनी सेवाभावी वृत्तीने खेड्यात जाऊन काम करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण त्यातील फार थोड्यांना यश आले आहे. पुष्कळजण अपयशही झाले आहेत. सुरुवातीला होणारा त्रास, गावकऱ्यांची असहकाराची भूमिका, काहींची त्रास देऊन कामात विघ्ने आणण्याची मानसिकता यावर प्रखर संयम आणि दृढ निश्चयाने मात करून निराश न होता अविरत मुंगीसारखे खपणे ज्यांना जमते त्यांचे श्रम निरुपयोगी न ठरता निश्चित फलदायी होतात. दगड फोडताना मारलेले पहिले काही घाव निरुपयोगी भासतात. पण त्यांचा परिणाम होतच असतो. या ठिकाणी फोडावयाचा दगड म्हणजे त्या खेडेगावात राहणाऱ्या लोकांचे मानसिक, वैचारिक हृदय परिवर्तन करणे. किती अवघड काम आहे !

ज्यांच्या अथक परिश्रम, प्रखर निर्धार व दृढनिश्चयामुळे काटेवाडी गावाला संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा सर्वोच्च प्रथम पुरस्कार मिळाला. त्या सौ. सुनेत्रा अजित पवार (सारे गाव त्यांना सुनेत्रा वहिनी याच नावाने संबोधते) यांच्याशी केलेला हा संवाद मुद्द्यांच्या स्वरुपात येथे आपल्यापुढे ठेवला आहे जेणेकरून यापुढील काळात खेडेगावच्या विकासाचे काम करण्याची इच्छा व मनिषा बाळगणाऱ्या आणि त्या दिशेने धडपडणाऱ्या सेवाभावी वृत्तीच्या कार्यकर्त्यांना दोन अनुभवाचे बोल मार्गदर्शक ठरू शकतील. हे बोल त्यांच्याच शब्दांत पुढीलप्रमाणे :

- *सुशिक्षितपणा व शिक्षणामुळे येणारा अहंकार बाजूला ठेवून खेडेगावातील लोकांना मी काही तरी नवीन शिकविण्यासाठी आले आहे असा आव न आणता उलट मी तुमच्याकडून काही शिकू इच्छिते अशी सुरुवातीला भूमिका ठेवून लोकांमध्ये आपण मिसळत गेलो तर ते आपल्याला त्यांच्यातले मानून जवळ येतात.*
- *आपले चारित्र्य सांभाळून दिवसरात्री जो कामात मग्न राहील आणि पडेल ते काम कोणावरही विसंबून न राहता स्वतः करण्याची तयारी ठेवील ती व्यक्ती खेडेगावाच्या दृष्टीने आपोआप उपयुक्त ठरून 'नभामाजी तारांगण । तैसे लोक' त्याच्या भोवती जमा होतील. खेडेगावातील लोक कृतज्ञ असतात आणि त्यांच्यात गुण पारखण्याची शक्तीही भरपूर असते. तुम्ही निःस्वार्थी भावनेने, शुद्ध अंतःकरणाने व निरलसपणे काम करीत आहात याची खात्री पटली तर ते ही स्वतःला झोकून देऊन कामात उतरतात आणि ते तडीस नेईपर्यंत उसंत घेत नाहीत असा माझा स्वतःचा अनुभव आहे.*
- *खेडेगावात काम करताना तेथील माणसांवर जसे प्रेम, विश्वास पाहिजे तशी कामावरही भक्ती पाहिजे. काम करणाऱ्या माणसांचा परिचय थोडा कमी असला तरी हरकत नाही पण त्यांच्याविषयीचा आदर तुमच्या मनात ओतप्रोत भरलेला असला पाहिजे आणि तो वागण्या बोलण्यातून व्यक्त होत गेला पाहिजे. केवळ शरीराने परिचय वाढला आणि त्याबरोबर मनातला*



स्थानिक जनतेविषयीचा अनादर वाढत गेला तर त्यातून कुणाच्याच पदरात काहीही लाभ पडत नाही.

- खेडेगावाचे काम करताना आपल्याला निश्चित काही त्याग करावा लागतो. त्या त्यागाचे भांडवल करून त्याचा सतत हिशेब मांडण्याचा प्रयत्न खऱ्या सेवकाने कधीच करू नये. तरच सेवा नीट होऊ शकते. गावातील लोकांच्या हृदयात आपले हृदय मिसळून त्यांच्याशी सातत्याने सुसंवाद, चर्चा करीत प्रश्नांची सोडवणूक करून विश्वास व प्रेम प्राप्त करावे लागते. सामुदायिक कामाचे सामर्थ्य ओळखून व त्याचे महत्त्व पटवून निर्भयतेने परिणामांची तमा न बाळगता प्रश्नांना सामोरे गेलो तर ते सहजपणे सुटू शकतात यावर माझा आता विश्वास बसला आहे.
- लोकांची मानसिकता बदलण्यासाठी खूप प्रयत्न व चिकाटी आणि संयम आवश्यक असतो. प्रबोधनाचे व परिवर्तनाचे निरनिराळे मार्ग योजून लोकांना ते काम व कार्यक्रम आपला आहे, त्यात आपले हित आहे असे वाटून त्या दिशेने त्याचा विश्वास वृद्धिंगत करीत गेले पाहिजे.
- प्रत्येक माणसाचे कौशल्य, समज, आवडनिवड, विषयाची जाण व आकलन शक्ती ही निरनिराळी असते. गाव एकच असले तरी प्रश्न निरनिराळे व ते सोडविण्याचे मार्ग, पद्धती निरनिराळ्या असतात. प्रत्येक माणसाची गुणवैशिष्ट्ये, स्वभाव व क्षमता लक्षात घेऊन त्या त्या प्रमाणे कामाची विभागणी करीत गेलो तर ते काम उत्कृष्ट होऊ शकते. काम करीत असताना राजकारणाचे जोडे कायम बाहेरच ठेवले पाहिजेत याची खूणगाठ सुरुवातीपासूनच मनात निश्चित केलेली बरी.
- खेडेगावातले काम अवघड आहे पण अशक्य नाही. त्यासाठी जिद्द, संयम व चिकाटी महत्त्वाची आहे. खेडेगावातील लोक कधी काय बोलतील आणि कशासाठी एक होतील हे सांगता येत नाही. त्यांची सगळी मानसिकताच वेगळी असते. पण जेव्हा लोकांना कळते की एखादी गोष्ट आपल्या चांगल्यासाठीच चालू आहे आणि पुढच्या पिढीचा त्यात फायदा आहे मग ते हळूहळू का होईना पण निःसंकोचपणे त्यात सामील होत जातात.
- काटेवाडीच्या कामात सर्व पवार कुटुंबियांनी मला सुरुवातीपासून प्रोत्साहन दिले व अडीअडचणीच्या वेळी मदत आणि मार्गदर्शनही केले. त्यामुळे कामाला एक विशिष्ट दिशा व वेग देता आला. पहिले मी माझे घर सांभाळले. घरातल्या माणसांची काळजी घेऊन नंतर उरलेला वेळ गावाच्या कामासाठी दिला. आपले घर वाऱ्यावर सोडून गावाच्या कामांचा बोजा उचलण्यात काहीच शहाणपण नाही. सगळे पवार कुटुंबीय या कामात मनापासून खंबीरपणे माझ्या पाठिशी उभे राहिले आणि काम कुठंवर आलंय? अशी सातत्याने कुतूहल व ममतेने चौकशी करीत राहिल्याने माझा कामातला हुरूप वाढत गेला.
- आता काटेवाडी हे भारतातले पहिले पर्यावरण संपन्न (इकोव्हीलेज) असे गाव बनविण्याचा संकल्प आम्ही सोडला आहे. त्या दृष्टीने सर्व कामांची रचना व नियोजन करण्यात येत असून प्रदूषणमुक्तीच्या दिशेने कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. स्वच्छता, निर्मलग्राम, तंटामुक्ती या अभियानांमध्ये सहभागी होऊन व त्यासाठीची असलेली पारितोषिके गावाने मिळविलेली असली तरीही तेवढ्यावरच समाधान मानून चालणार नाही. जीवनातला पुढचा काळ यशस्वी व शांतपणे जावा यासाठी पर्यावरणातले आदर्श गाव आम्ही बनविणारच.
- कामात जे यश मिळाले त्यात सर्वाधिक वाटा गावकऱ्यांचा आहे. त्यांनी मनापासून भरभरून साथ दिली, प्रेम दिले आणि अंगचोरपणा न करता पुढाकार घेऊन हिरीरीने व निर्धाराने काम केले म्हणूनच एवढं मोठं यश प्राप्त होऊ शकले.

योजना हाती घेण्यात आली आहे. २९ हात पंपांचाही पिण्याच्या पाण्यासाठी वापर होतो आहे. मेडिक्लेअर या औषधाची बाटली प्रत्येक घरोघरी देण्यात आली असून रोज त्याचे दोन थेंब टाकले जातात त्यामुळे पाणी शुद्ध होते. गेल्या २००४ पासून गावात संपूर्ण स्वच्छता असल्यामुळे इतर अनेक ठिकाणी डेंग्यू, चिकनगुण्या यांसारख्या रोगांच्या साथी आल्या पण काटेवाडीत त्याचा एकही रुग्ण सापडला नाही. सगळा परिसर स्वच्छ ठेवल्यामुळे आता गावात कसलाही आजार व साथी नाहीत. व्यसनमुक्तीवर खुप प्रबोधन करून गावातील सर्व हातभट्ट्या बंद करण्यात आल्या आहेत. पूर्वी गावात लोक घरीच हातभट्ट्या लावायचे. अशा ७० ते ८० हातभट्ट्या पूर्वी चालू होत्या. आता गाव पूर्णपणे व्यसनमुक्त झालेले असून एकही हातभट्टी गावात राहिलेली नाही. दोन अद्ययावत स्मशानभुमी बांधण्यात आल्या असून २९ सौर उर्जेचे दिवे सार्वजनिक ठिकाणी बसविण्यात आले आहेत. प्राथमिक शाळेत सौर रात्र अभ्यासिका बनविण्यात आली असून रात्रीच्या वेळी मुले तेथे जाऊन अभ्यास करतात.

प्राथमिक शाळेतील मुलांना गरम शिजविलेले अन्न खायला देता यावे म्हणून सौर कुकर घेतले असून प्राथमिक शाळेत ३५२, अंगणवाडीत २२५ तर हायस्कूलमध्ये ६५० विद्यार्थी शिकत आहेत. हायस्कूलचे मैदानही अद्ययावत व सुसज्ज करण्यात आलेले आहे. गावकऱ्यांनी श्रमदानातून वृक्षारोपन, दलित वस्तीतील रस्ते, १५ ते १८ फुट उंच हायस्कूलचे मैदान मातीने भरणे यासारखी कामे केली आहेत. गावाला गावठान अजिबात नव्हते. त्यामुळे ग्रामसचिवालय बांधणे, शाळेची उभारणी करणे यासाठी स्वतःची जागा नव्हती. गावातील लोकांनी सार्वजनिक कामासाठीच्या या जागा विनामोबदला ग्रामपंचायतीला दिल्या. २५ जानेवारी २००८ रोजी ग्रामपंचायतीची निवडणूक होऊन १५ पैकी १३ जागांवर महिला सदस्य निवडून आल्या. गावात आज एकही कुपोषित बालक नसून २००७-०८ पासून तंटामुक्त गाव योजनेतही काटेवाडीने भाग घेतला आहे. ४०-४५ वर्षांपूर्वीचे खटले व दावे आपापसांत समझोत्याने मिटविण्यात आले असून सर्व फौजदारी खटले निकाली काढण्यात आले आहेत. शेतीच्या क्षेत्रात उत्कृष्ट काम केल्याबद्दल गावाला जिल्हा परिषदेचा 'कृषी ग्राम पुरस्कार' मिळाला असून गावातील सर्व घरांना गुलाबी रंग देण्यात आला आहे व ही सर्व घरे महिलांच्या नावावर केलेली असून त्यांच्या नावाच्या पाट्या दरवाज्यावर लावण्यात आलेल्या आहेत. सर्व सार्वजनिक इमारतींवर रेनवॉटर हार्वेस्टिंगचे काम करण्यात आलेले असून गावात ४० महिला बचत गट काढण्यात आले आहेत. या महिलांना अद्ययावत असे प्रशिक्षण विविध शिबीरे, व्याख्याने, प्रात्यक्षिके, फिल्म दाखविणे, प्रत्यक्ष उद्योगधंद्याच्या ठिकाणी जाऊन भेट देणे आदी मार्गांनी देऊन स्पर्धेसाठी सुसज्ज बनविले जात आहे. युवकांसाठी योगासने, आर्ट ऑफ लिव्हिंगचे कोर्स आणि त्याला स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी गांडुळ खत, काजु प्रोसेसिंग प्रकल्प, दुध धंदा असे निरनिराळे शेतीविषयक प्रकल्प उभे करण्यासाठी मदत व मार्गदर्शन केले जात आहे. हवेतील प्रदुषण कमी करण्यासाठी अजुन भरपूर झाडे लावण्यात येणार असून अपारंपारीक उर्जेचा वापर करण्यावर भर दिला जाणार आहे.

संत गाडगेबाबा अभियानात लोक सहभाग हा फार महत्वाचा घटक असून लोकांनी काम कसे करावयाचे हे शासनाने त्यांच्या परिपत्रकात नमुद केलेले आहे. गावाने गावासाठी स्वतःच्या खर्चातून चालविलेली ही योजना आहे व शासनाचा तिला पाठिंबा आहे हे गावात हिंडल्यावर आपल्या लगेचच लक्षात येते. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान १९९९ साली सुरू झाले आणि राज्यातील पहिला पुरस्कार सध्या पुण्याचे जिल्हाधिकारी असलेल्या श्री. चंद्रकांत दळवी यांच्या सातारा जिल्ह्यातील निढळ या गावाला मिळाला होता. श्री. अजित पवार हे त्यावेळी सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री होते. जिल्हा पातळीवर जेव्हा निढळ हे गाव पहिले आले होते तेव्हा श्री. अजित पवार हे आपली पत्नी सौ. सुनेत्रा हिला घेऊन पारितोषिक वितरण समारंभासाठी निढळ येथे गेले होते. निढळ गावाने केलेले काम पाहिल्यानंतर सौ. सुनेत्रा वहिनींनी आपल्या काटेवाडी गावात असेच काम करण्याचा निर्धार केला आणि तेव्हापासून म्हणजे गेली नऊ वर्षे त्या या कामाच्या पूर्ततेसाठी धडपडत आहेत. जिल्ह्यात व विभागात हे गाव प्रथम आल्यानंतर ते राज्य पातळीवरही प्रथम आले पाहिजे याची जबाबदारी जिल्ह्याच्या प्रशासनाने काही प्रमाणात का होईना उचलून त्या गावाला मदत केली पाहिजे म्हणून जिल्हाधिकारी श्री. दळवी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी गावाची त्या दृष्टीकोनातून पाहणी केली व मार्गदर्शन केले. निढळ गावातील काही कार्यकर्ते एक दिवस काटेवाडीत जाऊन राहिले. आणि सगळ्या कामांची पाहणी करून त्यांनी ३५ मुद्दे असे शोधून काढले की ज्यावर गावकऱ्यांनी आणखीन काम करण्याची गरज होती. गावकऱ्यांनी आपले मनोबल सतत उंचावर ठेऊन ही सर्व कामे प्रामाणिकपणे केली म्हणूनच त्यांना हे राज्यातील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळू शकले आहे. काटेवाडीच्या शेजारीही अनेक गावे असून व जवळच बारामतीसारखे मोठे तालुक्याचे ठिकाण असून त्यांनीही या काटेवाडीपासून स्वच्छतेचा काही बोध घ्यावा अशी अपेक्षा जनतेने बाळगली तर ते वावगे ठरू नये.

●●●



# अखेर 'ॲशेस' जिंकले इंग्लंडने...
# व्हॉलीबॉल-जलतरणात भारतीय युवकांची चमक

- मुकुन्द मोघे



**गेल्या महिन्यात जागतिक क्रीडाविश्वाच्या केंद्रस्थानी राहिली ती इंग्लंड व ऑस्ट्रेलिया या पारंपरिक क्रिकेट संघादरम्यानची 'ॲशेस' मालिका आणि फॉर्म्युला शर्यतींचा माजी जगज्जेता मायकेल शूमाकर यांच्या संभाव्य पुनरागमनाचे सनसनाटी वृत्त...**

जे पुढे फक्त वृत्तच ठरले त्यापैकी 'ॲशेस' मालिकेत अगदी अनपेक्षितपणे ॲण्ड्र्यु स्ट्रॉसच्या नेतृत्वाखालील इंग्लिश संघाची सरशी झाली आणि त्यातील पराभवामुळे आजवर सातत्याने विश्वविजेता म्हणून वावरलेल्या रिकी पॉन्टिंगच्या ऑस्ट्रेलिया संघावर जागतिक क्रमवारीत चक्क चौथ्या क्रमांकावर घसरण्याची 'न भूतो' म्हणावी अशी नामुष्की ओढवली. खरे तर, शेन वॉर्न व ग्लेन मॅकग्रा ही हुकुमी गोलंदाज जोडगोळी आणि हेडन-मार्टिन व गिलख्रिस्त ही घणाघाती फलंदाज त्रिमुर्ती निवृत्त झाल्यामुळे गेले वर्ष-दीड वर्ष ऑस्ट्रेलियाचा संघ चांगलाच अडचणीत आलेला आहे. परंतु सहा महिन्यांपूर्वी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन कसोटी मालिका सन्मान्यरीत्या अनिर्णित राखण्यात यश मिळाल्यामुळे पॉन्टिंगच्या नव्या संघास लौकरच जुना सूर गवसणार अशी आशा वाटू लागली होती. परंतु यावेळी 'ॲशेस' मालिकेत एक-दोन डाव वगळता इंग्लंडपेक्षा निर्विवादपणे सरस खेळ करूनही त्यांना २-१ अशा पराभवास सामोरे जावे लागले आहे. त्यांच्या या अपयशास जिद्दी पण संयमी स्ट्रॉसच्या



नेतृत्वाखाली खेळणाऱ्या इंग्लिश खेळाडूंचा सकारात्मक खेळ जेवढा जबाबदार ठरला तेवढेच इंग्लंडमधील लहरी-खराब हवामान व पंचांची निकृष्ट-दोषपूर्ण कामगिरीही! या मालिकेत १-० अशी आघाडी घेण्याची सुवर्णसंधी पहिल्याच कसोटी सामन्यात घावल्यानंतर (आडवा, पानसेर-अँडरसन या शेवटच्या इंग्लिश जोडीने त्या कसोटीच्या अखेरच्या सत्रात झुंझार खेळ करून नाबाद परतण्याची बजावलेली कामगिरी) अॅण्ड्र्यु स्ट्रॉसच्या दणदणीत शतकामुळे व फ्लिंटॉफ-स्वान-अँडरसनच्या भेदक गोलंदाजीमुळे ऑस्ट्रेलियास दुसरा कसोटी सामना गमवावा लागला. त्या सामन्यात कर्णधार पॉन्टिंगसह किमान तीन ऑस्ट्रेलियन फलंदाजांना चुकीने बाद देऊन पंचांनी संपूर्ण मालिकेचाच नूर बदलून टाकला असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरू नये.

हा 'नूर' आणखी बदलला तो एजबॅस्टनच्या तिसऱ्या कसोटीत पावसाने हजेरी लावल्यामुळे! खराब हवामानाचा फटका बसलेल्या या कसोटीत जेमतेम तीन-साडेतीन दिवसांचा खेळ झाला आणि ती अनिर्णित राहिली. ऑस्ट्रेलियातर्फे सर्वाधिक धावा करणारा खेळाडू हा मान रिकी पॉन्टिंगने येथे पटकावला आणि तेच या सामन्याचे वैशिष्ट्य ठरले. आजवर माजी कर्णधार अॅलन बोर्डर याचा ११९७५ धावांचा विक्रम ऑस्ट्रेलियात अबाधित होता, पण आता तो बॉर्डरपेक्षा २३ कसोटी सामने कमीच खेळून पॉन्टिगने सहजी मोडला आहे. अर्थात कसोटी धावांच्या शिखरावर असलेला आपला सचिन तेंडुलकर आणि त्याच्या किंचित मागे राहिलेला वेस्ट इंडिजचा ब्रायन लारा यांना गाठण्यासाठी त्याला आणखी किमान हजार-दीड हजार धावा तरी कराव्या लागणार आहेत. ही कामगिरी बजावण्यात तो यशस्वी होईल का, याचे उत्तर आगामी काळच देईल.

सर्वाधिक धावांच्या विक्रमापाठोपाठ पॉन्टिंगचा उत्साह द्विगुणित केला तो लीडस् येथे खेळल्या गेलेल्या चौथ्या कसोटीतील शानदार विजयाने. या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीस उतरलेल्या इंग्लिश संघाचा डाव फक्त १०२ धावांत गुंडाळला गेला. नवा तेज गोलंदाज सिड्ल (५ बळी) आणि दुखापतीमुळे दीर्घकाळ विश्रांती घ्यावी लागलेला वेन क्लार्क (१८ धावांत ३ बळी) यांनी इंग्लंडची ही दाणादाण उडविली होती. त्यांच्या या कामगिरीस मग नॉर्थ (११०), मायकेल क्लार्क (९२), पॉन्टिंग



(७८) व वॅटसन (५१) या ऑस्ट्रेलियन फलंदाजीचीही सुरेख जोड मिळाली आणि त्या संघाने साडेचारशे धावांचा पल्ला गाठला. पहिल्या डावात साडेतीनशे धावांनी मागे पडलेल्या इंग्लंडची दुसऱ्याही डावात ५ बाद ८० अशी घसरगुंडी उडाली होती, परंतु त्यांच्या ख्रिस ब्रॉड व स्वान या तळाच्या फलंदाजांनी तडाखेबंद अर्धशतके झळकावून अधिक नामुष्की टाळली. हा सामना १ डाव ८० धावांनी जिंकून ऑस्ट्रेलियाने मालिकेत बरोबरी केली आणि मग साऱ्या क्रिकेट जगताचे लक्ष ओवल मैदानावरील पाचव्या व अंतिम कसोटी सामन्याकडे वळले.

आत्तापर्यंतचा एकंदर खेळ पाहाता ही निर्णायक कसोटी व त्याबरोबर मालिकाही ऑस्ट्रेलियाच जिंकेल. अशी सर्वसाधारण अपेक्षा होती. परंतु भरंवशाच्या म्हशीला टोणगा व्हावा, तसा काहीसा निराशाजनक खेळ पॉन्टिंगसह सर्वच ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी येथे केला आणि मग अखेर पराभवाखेरीज त्यांच्या हाती काहीच लागले नाही. या सामन्यात प्रथम खेळताना इंग्लंडने कर्णधार स्ट्रॉस (५२), इयान बेल (७२) व नवा तारा जोनाथन ट्रॉट (धावबाद ५०) यांच्या अर्धशतकाच्या बळावर सर्वबाद ३३२ अशी समाधानकारक धावसंख्या उभारली. त्यास उत्तर देताना ऑस्ट्रेलियाचा संघ मात्र बिनबाद ८० वरून सर्वबाद १६० असा कोसळला. जलदगती ब्रॉड (३७ धावात ५ बळी) आणि फिरकी गोलंदाज स्वान (४ बळी) या दुकलीने त्यांची ही दाणादाण उडविण्यात सिंहाचा वाटा उचलला. हा 'सेट बॅक' पुरेसा ठरणार नाही म्हणून की काय, इंग्लंडने दुसऱ्या डावात ९ बाद ३७३ अशी मजल मारून विजयासाठी ५४६ धावा करण्याचे अशक्यप्राय आव्हान पॉन्टिंग आणि कंपनीपुढे ठेवले. स्ट्रॉसचे पाऊणशतक आणि नवोदित ट्रॉटचे शतक ही इंग्लंडच्या या डावाची मुख्य वैशिष्ट्ये ठरली. त्यांच्या खेळाला तोडीस तोड उत्तर देण्याचा प्रयत्न पॉन्टिंग (धावबाद ६६) व मायकेल हंसी (१२७) यांनी केला खरा, परंतु अखेर त्यांना तब्बल १९८ धावांनी पराभूत व्हावे लागले.

'ॲशेस' मालिकेतील या पराभवांमुळे इंग्लंडमधील सलग दोन मालिका गमावण्याचा बट्टा पॉन्टिंगच्या झळाळत्या कारकिर्दीस लागला आहे आणि आधी म्हटल्याप्रमाणे जागतिक क्रमवारीत दक्षिण आफ्रिका, श्रीलंका व भारत या तीन देशांनी ऑस्ट्रेलियावर प्रथमच आघाडी घेतली आहे. क्रिकेटींग ऑर्डरमधील हा अनपेक्षित बदल सर्वचदृष्ट्या लक्षणीय असून त्यामुळे नजिकच्या भविष्यात जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पटकावण्याची सुवर्णसंधी भारतास प्राप्त झाली आहे. आता श्रीलंकेविरुद्धची आगामी कसोटी मालिका जिंकून धोनी व त्याचे सहकारी ती साधतात का हे पाहाणे विशेष औत्सुक्याचे ठरणार आहे.

## श्रीलंकेची पाक-न्यूझीलंडवर मात

ट्वेंटीट्वेंटी विश्वकरंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पाकिस्तानकडून पराभव झाल्यामुळे उपविजेतेपदावर समाधान मानावे लागलेला कुमार संगाकाराचा श्रीलंका संघ सध्या चांगलाच भरात आहे. प्रबळ पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी मालिकेप्रमाणे पाच एकदिवसीय सामन्यांची मालिकाही त्या संघाने जिंकली असून नुकतेच त्याने व्हिटोरीच्या न्यूझीलंड संघासही दोन कसोटी सामन्यात पाणी पाजले आहे.

दहशतवादाच्या भितीदायक सावटामुळे गेले वर्ष-दीड वर्षे पाकिस्तानचे खेळाडू फारसे कसोटी क्रिकेट खेळले नव्हते. त्यामुळे श्रीलंका संघाने त्यांच्याविरुद्धची कसोटी मालिका २-० अशी सहज जिंकली तेव्हा कोणालाच फारसे आश्चर्य वाटले नाही. परंतु आपली ही विजय मालिका त्यांनी एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतही कायम राखली आणि तेही पाकिस्तान संघात शाहीद आफ्रिदी, अब्दुर रझाक, महंमद युसुफ व राणा या सर्व जबरदस्त खेळाडूंचे पुनरागमन झाले असताना आणि आपला दर्जा उंचावलाय हे निर्विवादपणे सिद्ध करून दिले. या दोन्ही मालिकांत कर्णधार संगाकारा, महेला जयवर्धने व समरवीरा हे पट्टीचे फलंदाज आणि कुलशेखरा व मॅथ्यूज हे नवे तेज गोलंदाज यांनी अतिशय सातत्यपूर्ण खेळ केला आणि पाकिस्तानला



नामोहरम करण्यात मोठा वाटा उचलला. अर्थात पहिले तीन एकदिवसीय सामने गमावल्यानंतर का होईना पण कर्णधार युनिस खान व भरंवशाचा मिसबा उल हक यांना या मालिकेत प्रथमच चांगला सूर गवसला आणि मग शेवटचे दोन सामने जिंकण्यात पाकला यश मिळाले.



अर्थात, एकीकडे हे माफक यश पदरात पडत असताना दुसरीकडे पाकिस्तानी खेळाडूंना 'मॅच फिक्सिंग'च्या आरोपांना तोंडही द्यावे लागत आहे. या खेळाडूंच्या हॉटेलमध्ये भारतीय बुकींची सर्रास ये-जा होत होती, असा खळबळजनक आरोप निवड समितीचे माजी अध्यक्ष अब्दुल कादिर यांनीच केला असून, तो फेटाळण्यात आलेला असला तरी आता कर्णधार युनिस व त्याच्या नव्या-जुन्या सहकाऱ्यांच्या एकंदर विश्वासार्हतेबद्दल निश्चितच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान हे संशयाचे जाळे पुरेसे नाही म्हणून की काय, संघाचा उपकर्णधार मिसबा उल हकच्या हकालपट्टीची मागणी अचानकपणे करून युनिसखानने सध्याच्या गोंधळात अधिकच भर टाकली आहे. ट्वेंटीट्वेंटीचे विश्वविजेतेपद मिळविल्यानंतर लगेचच आपला संघ जगातील सर्वोत्कृष्ट असल्याच्या केलेल्या वल्गना आता युनिसच्या इतक्या अंगाशी आल्या आहेत की माजी कर्णधार सर्फराज नवाझने त्याला नुकताच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा सल्ला देऊन टाकला आहे.

सध्या डॅनियल व्हिटोरीचा न्यूझीलंड संघ श्रीलंकेच्या दौऱ्यावर आलेला असून गॅले येथे झालेला पहिला कसोटी सामना त्याने गमावला आहे. त्या कसोटीत श्रीलंका संघाने पहिल्या डावात ४५० धावांचा पल्ला गाठून तर दुसऱ्या डावात ४ बाद २६० धावा करून संपूर्ण वर्चस्व गाजविले. जयवर्धने, समरवीरा व दिलशानची शतके हे या सामन्याचे वैशिष्ट्य ठरले. त्यांच्या जोरदार खेळास चोख प्रत्युत्तर देण्यात न्यूझीलंडचा संघ कमी पडला तो मुख्यतः त्यांचे बरेचसे खेळाडू फ्ल्यूची शिकार झाल्याने! खुद्द कर्णधार व्हिटोरीने दोन्ही डावात अर्धशतके झळकावून संघाची बाजू सावरण्याचा चांगला प्रयत्न केला. परंतु अखेर मुरलीधरच्या जादुई फिरकीने श्रीलंकेच्या विजयावर शिक्कामोर्तब केलेच. या सामन्यात न्यूझीलंडचे सात फलंदाज तंबूत पाठविणाऱ्या मुरलीधरनच्या एकूण कसोटी बळींची संख्या आता ७७७ वर गेली आहे.



## मरेची आगेकूच पण फेडररच अव्वल

या महिन्यात मॉंट्रियल व सिनसिनाटी अशा दोन एटीपी मास्टर्स टेनिस स्पर्धा पार पडल्या. त्यापैकी मॉंट्रियलमध्ये अग्रमानांकित रॉजर फेडरर व दोन-तीन महिन्यांच्या सक्तीच्या विश्रांतीनंतर आंतरराष्ट्रीय टेनिसमध्ये पुनरागमन केलेला रॅफेल नदाल या दोन्ही अव्वल खेळाडूंचे आव्हान उपांत्यपूर्व फेरीतच संपले. या स्पर्धेतील अंतिम लढत ब्रिटनचा अँडी मरे व स्पेनचा डेल पेलो यांच्यात होऊन त्यात मरेने बाजी मारली. मास्टर्स टेनिस स्पर्धा जिंकणारा पहिला ब्रिटिश खेळाडू बनण्याचा मान त्याने पटकावला असून जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे. गेली तीन वर्षे या क्रमवारीतील पहिली दोन स्थाने ही फेडरर व नदाल यांची मिरासदारी बनली होती, आता मरेने नदालला मागे टाकून आंतरराष्ट्रीय टेनिसमधील चुरस निश्चितच वाढवली आहे. अर्थात त्याचा हा बहर 'सिनसिनाटी मास्टर्स' मध्ये किंचित ओसरला. तेथे उपांत्य फेरीत त्याला हरवून रॉजर फेडररने अंतिम फेरी गाठली आणि मग जोकोविकचे आव्हान ६-१, ७-५ असे सरळ दोन सेटस्‌मध्ये मोडून काढत विजेतेपदही पटकावले. मास्टर्स टेनिस स्पर्धा जिंकण्याची फेडररची ही सोळावी वेळ असून, आंद्रे अगासीच्या सतरा विजेतेपदांच्या विक्रमांची बरोबरी करण्यासाठी त्याला आणखी फक्त एका विजेतेपदाची आवश्यकता आहे. दोन महिन्यांपूर्वी फ्रेंच व विंबल्डन ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धा जिंकून आंतरराष्ट्रीय टेनिसच्या सर्वोच्च शिखरावर



पोचलेला हा महान खेळाडू आणखी किती शिरपेच आपल्या राजमुकुटात खोवणार आहे हे त्यालाच माहित! एक गोष्ट मात्र निश्चित ती म्हणजे त्याचा प्रसन्न, सहजसुंदर खेळ पाहाणे हा खरोखरच एक निखळ आनंदानुभव असतो. त्याची अनुभुती मिळणे कधी थांबूच नये, अशीच जगभरच्या टेनिस रसिकांची इच्छा राहील.

## विश्वनाथन आनंदला शह?

मेन्झ रॅपिड चेस चॅम्पियनमध्ये आजवर तब्बल अकरा वेळा अजिंक्य राहिलेल्या ग्रॅण्ड मास्टर विश्वनाथन आनंदला



यंदा मात्र तेथे हार पत्करावी लागली आहे. या फोर मेन इव्हेंटमध्ये त्याला आर्मोनियाचा लीवन ॲरोनियन आणि रशियाचा इयान निपोनियाचिती या दोन्ही नवोदितांनी नमविले. हे दोघे पहिले दोन क्रमांक पटकावत असताना अनुभवी आनंद मात्र तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला.

या धक्कादायक पराभवाबद्दल बोलताना आनंदने "That's life. If you play badly, you get punished" ही जी प्रतिक्रिया व्यक्त केली ती त्याची महानताच स्पष्ट करणारी आहे. खेळ म्हटला की मग तो कोणताही असो- हार-जित ही आलीच, हे ज्याला कळते तोच उत्तम खेळाडू बनू शकतो. यशाच्या

अत्युच्च शिखरावर पोचल्यावरही आनंदसारखे खेळाडू मातत नाहीत आणि पराभव झाला म्हणून खचत नाहीत ते त्यामुळेच !

## युकी भांबरीचे सुयश

भारताचा कोवळा 'टेनिस स्टार' युकी भांबरीने नुकतेच एटीपीच्या सर्वोत्तम पाचशे खेळाडूंच्या यादीत स्थान मिळविले. हा पराक्रम गाजविणारा तो जगातील सर्वात अल्पवयीन टेनिसपटू ठरला आहे. यंदा ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत ज्युनियर गटात अजिंक्य ठरलेल्या १७ वर्षीय युकीने नंतरच्या काळात तीन आयटीएफ टेनिस स्पर्धाही जिंकल्या आहेत. सध्या तो फ्लोरिडातील जगप्रसिद्ध 'नीक बोलेटेरी टेनिस ॲकॅडमी'त प्रशिक्षण



घेत असून तेथे त्याला टॉमी हास व रॅदेक स्टीपानेकसारख्या बड्या खेळाडूंशी खेळण्याची संधी मिळत आहे.

## बॅडमिंटनमध्ये चीनचेच राज्य

हैदराबादमध्ये झालेल्या वर्ल्ड बॅडमिंटन चॅम्पियनशीपमधील बहुतेक सर्व पदके चीनच्या खेळाडूंनीच पटकावली आणि या क्षेत्राचे राजेपद आपल्याकडेच आहे हे पुन्हा सिद्ध करून दिले.

या स्पर्धेत भारताची अव्वल बॅडमिंटनपटू सायना नेहवालकडून मोठ्या अपेक्षा होत्या. परंतु स्पर्धेआधी गोवर-



कांजिण्या आल्यामुळे ती सरावसुद्धा करू शकली नव्हती. अखेर हे आजारपण व त्यामुळे आलेला अशक्तपणा या दोन्हीवर केवळ जबर इच्छाशक्तीच्या मात करून सायना या स्पर्धेत खेळली आणि रशिया व बल्गेरियाच्या प्रतिस्पर्ध्यांना नमवून तिसऱ्या फेरीतही पोचली. तेथे मात्र तिचे आव्हान चीनच्या वांग लीनने सरळ दोन सेटस्‌मध्ये मोडून काढले आणि गेल्या जूनमध्ये इंडोनेशियन ओपनमध्ये झालेल्या पराभवाचा वचपा काढला.

या स्पर्धेत चेतन आनंद, व्ही ज्वालासारखे अन्य काही भारतीय खेळाडूही उतरले होते, पण त्यांना पहिली फेरीही ओलांडताना आली नाही.

लष्कर-ए-तैय्यबाच्या दहशतवाद्यांकडून या स्पर्धेवर हल्ला होणार असल्याचा इशारा मिळाला होता. त्याची नोंद घेऊन इंग्लिश संघाने अखेरच्या क्षणी स्पर्धेतून माघार घेतली. भारत सरकारने संपूर्ण सुरक्षिततेचे आश्वासन दिलेले असताना व स्पर्धास्थळी कडेकोट बंदोबस्त ठेवलेला असताना इंग्लिश संघाने असे पाऊल उचलणे धक्कादायक होते. परंतु सुदैवाचा भाग असा की त्यांचे अनुकरण अन्य एकाही संघाने केले नाही. भारतात सर्व काही आलबेल आहे, हे सिद्ध करून देण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम या स्पर्धेस मुद्दाम उपस्थित राहिले होते. विशेष म्हणजे त्यांनी या स्पर्धेचा आनंद सामान्य प्रेक्षकांप्रमाणे तिकीटाच्या रांगेत उभे राहून आणि कोणत्याही विशेष बंदोबस्ताविना स्टेडियममध्ये बसून लुटला आणि सर्वांनाच चकित केले.

## युवा व्हॉलीबॉलपटूंची कमाल

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात २१ वर्षाखालील युवकांची जागतिक व्हॉलीबॉल स्पर्धा पार पाडली. त्यात उतरलेला भारतीय युवक संघ तसा नवशिका व पूर्णपणे अननुभवी होता. परंतु नैसर्गिक गुणवत्तेला अफाट जिद्दीची जोड देत त्याने ट्युनिशिया, अमेरिका, रशिया व बेल्जियमच्या प्रबळ संघावर मात करून उपांत्य फेरी गाठली. तेथे स्पर्धेचा विजेता ब्राझीलकडून या संघाची आगेकूच रोखली गेली पण हा पराभव भारतीय युवकांनी स्विकारला तो सर्व पाच सेट कडवी झुंज देऊनच! त्यांच्या या जिगरबाज खेळाचे कौतुक परदेशी संघांच्या प्रशिक्षकांनी Indian boys are killers on court अशा शब्दात केले तर व्हॉलीबॉल फेडरेशनने त्यांना पाच लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर केला. संघाचा कर्णधार मनदीपसिंग, गुरींदरसिंग, मन्नीदुराय नवीन आणि नवजितसिंग हे चार खेळाडू या स्पर्धेत विशेष गाजले आणि भारताच्या 'रेकॉर्डब्रेकिंग रन'चे शिल्पकार ठरले.




## जलतरणपटूंनी टोकियो जिंकले



टोकियोत झालेल्या आशियायी जलतरण स्पर्धेत कोल्हापूरच्या वीरधवल खाडेने तीन नव्या राष्ट्रीय विक्रमाची नोंद करीत चार सुवर्ण व एका रौप्य पदकाची कमाई केली. या पराक्रमामुळे आता त्याचा समावेश 'टॉप हंड्रेड'मध्ये झाला आहे. तो ही अभिमानास्पद कामगिरी बजावत असताना रिचा मिश्राने १५०० मी. फ्री स्टाईलमध्ये सुवर्ण तर रोहन पोंछा (२०० मी बटरफ्लाय) व एरॉन डिसोझा (४०० मी. फ्री स्टाईल) यांनी रौप्यपदके पटकावली. हा भारतीय संघ वॉटरपोलोत कांस्य पदकाचा मानकरी ठरला.







# बीसीसीआयचा वरदहस्त आता फुटबॉललाही...




भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या वरदहस्ताचा लाभ यावेळी प्रथमच अ.भा. फुटबॉल महासंघास लाभला असून २०११ मध्ये होणाऱ्या आशिया करंडक स्पर्धेच्या पूर्वतयारीसाठी तब्बल २५ कोटी रुपयांची देणगी त्याच्या पदरात पडली आहे. सध्या फुटबॉल महासंघाच्या अध्यक्षपदी नागरी विमान वाहतूकमंत्री प्रफुल्ल पटेल असून, त्यांनी क्रिकेट नियामक मंडळाचे सर्वेसर्वा ना. शरद पवार यांच्याकडे शब्द टाकल्यामुळेच हे घडू शकले आहे. या भरघोस देणगीबद्दल चुनी गोस्वामी व डेरेक परेरा यांच्यासारख्या बुजुर्ग फुटबॉलपटूंनी पवारसाहेबांबद्दल विशेष कृतज्ञता व्यक्त केली आहे.

दरम्यान, राजधानी दिल्लीत खेळल्या जात असलेल्या नेहरू करंडक फुटबॉल स्पर्धेत अंतिम फेरी गाठून बैचुंग भुतियाच्या भारतीय संघाने गतसालच्या कामगिरीची सुखद पुनरावृत्ती केली आहे. अंतिम लढत भारत-सिरीया अशी झाली आणि त्यात मात्र स्पर्धेत आत्तापर्यंत अपराजित राहिलेल्या सिरीया संघाचे आव्हान मोडून भारताने विजेतेपद पटकावले.

# नगरच्या पंकज शिरसाट याला अर्जुन पुरस्कार

अहमदनगर येथील राष्ट्रीय कब्बडी खेळाडू श्री. पंकज नवनाथ शिरसाट यांना यावर्षीचा मानाचा अर्जुन पुरस्कार मिळाला असून क्रिडादिनी म्हणजे २९ ऑगस्ट २००९ रोजी भारताच्या महामहिम राष्ट्रपती प्रतिभाताई देवीसिंह पाटील यांच्या हस्ते त्यांना तो प्रदान करण्यात आला. पुरस्कारात रोख ५ लाख रूपये, सन्मानपत्र आणि ट्रॉफी यांचा समावेश आहे.

श्री. पंकज शिरसाट हे १९९३ पासून कब्बडी खेळाशी संबंधीत आहेत. गेल्या दोन वर्षांपासून श्री. शिरसाट हे मुंबईला एअर इंडियात नोकरी करीत असून १९९९ पासून महाराष्ट्राच्या पुरुष संघात कब्बडी खेळत आहेत. २००७ पासून कब्बडी या खेळाचे भारतीय टीमचे ते कॅप्टन असून २००१ सालापासून राष्ट्रीय पातळीवर कब्बडी खेळत आहेत. श्री. शिरसाट यांना २००१ साली मानाचा महाराष्ट्र सरकारतर्फे दिला जाणारा छत्रपती पुरस्कार मिळाला होता. २००५ मध्ये नामदार दिलीप वळसे पाटील यांनी मंचर येथे २५ वा फेडरेशन कप घेतला होता. त्यात महाराष्ट्राने २४ वर्षांनंतर पहिल्यांदा प्रथम क्रमांकाचे विजेतेपद प्राप्त केले होते आणि त्या संघाचे नेतृत्व श्री. शिरसाट यांनी केले होते एवढेच नव्हे तर स्पर्धेतला सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून दिला जाणारा पुरस्कारही श्री. शिरसाट यांनाच मिळाला होता. या पूर्वी चिपळून ता. रत्नागिरी येथील श्री. अशोक शिंदे या कब्बडी खेळाडूला हा मानाचा अर्जुन पुरस्कार मिळाला होता.

चीनमध्ये २००८ साली झालेल्या १६ व्या आशियायी खेळांमध्ये कब्बडी संघाचे नेतृत्व श्री. शिरसाट यांनी करून सुवर्ण चषक मिळविले होते. २००७ मध्ये मकाऊ येथे झालेल्या एशियन इनडोअर खेळामध्येही भारतीय संघाचे नेतृत्व करून त्यांनी सुवर्ण पदक मिळविले होते. २००७ मध्ये पनवेल येथे झालेल्या जागतिक कब्बडी स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधीत्व करून त्यांनी सुवर्णपदक मिळविले होते. पाकिस्तान, बँकॉक, बांग्लादेश, दोहा (कतार), कोलंबो (श्रीलंका) आदि देशातील कब्बडी स्पर्धांमध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधीत्व करून श्री. शिरसाट यांनी पारितोषिके मिळविली आहेत.

●●●

